बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | गुरूवार,दि.१८जुलै २०२४ | वर्ष३रे | अंक३५४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## भारतीय किसान संघाचे अधिवेशन

बीड:दर तीन वर्षाला भारतीय किसान संघाचे अधिवेशन असते. यावर्षी भारतीय किसान संघाचे बीड जिल्हा अधिवेशन दिनांक २२.०७.२०२४ सोमवार रोजी वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे आयोजित केले आहे. या अधिवेशनात लोकशाही पद्धतीने ग्राम समित्या, तालुका समित्या व जिल्हा कार्यकारिणीची निवड होणार असून प्रत्येक स्तरावरील समित्याचे कामकाज काय असते? याचे मार्गदर्शन महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री मा. दादा लाड हे करणार असून या अधिवेशनाला महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष बळीराम सोळंके उपस्थित राहणार आहेत. सध्या शेतकऱ्यांसमोर बऱ्याच समस्या आहेत. त्या सोडविण्यासाठी काही ठराव ही पारित करण्यात येणार आहेत. अधिवेशना नंतर शोभायात्रा निघणार आहे. तरी भारतीय किसान संघाच्या बीड जिल्ह्यातील सर्व सभासदांनी अधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हा अध्यक्ष तुकारामजी चोपडे, उपाध्यक्ष बाळासाहेब भोजने, रामप्रसाद आगे, जिल्हा मंत्री प्रा. अशोक होके, जिल्हा सहमंत्री अशोकराव तौर यांनी केले आहे.

काही का असेना
शिंदे सरकार
भलतंच भारी
घेऊन आलं

# लाडका भाऊ योजना!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अजून एक योजना चर्चेत • लाडका भाऊ योजनेचा फायदा कुणाला मिळणार? • योजना आणली खरे पण वयाची मर्यादा फारच कमी!



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेनंतर आता लाडक्या भावांसाठी देखील एक योजना आणली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूरमध्ये एक महत्वपूर्ण घोषणा केली आहे. मुख्यमंत्र्यांनी 'लाडका भाऊ' योजना जाहीर केली . या योजनेअंतर्गत १२ वी पास झालेल्या तरूणांना दरमहा ६ हजार रुपये, डिप्लोमा केलेल्या विद्यार्थ्यांना ८ हजार रुपये आणि पदवीधर विद्यार्थ्यांना १० हजार स्टायपेंड देण्याची घोषणा करण्यात आली.'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेनंतर आता लाडक्या भावांसाठी देखील एक योजना आणली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूरमध्ये एक महत्वपूर्ण घोषणा केली आहे. मुख्यंमंत्र्यांनी 'लाडका भाऊ' योजना जाहीर केली. या योजनेअंतर्गत १२ वी पास झालेल्या तरूणांना दरमहा ६ हजार रुपये, डिप्लोमा केलेल्या विद्यार्थ्यांना ८ हजार रुपये आणि पदवीधर विद्यार्थ्यांना १० हजार स्टायपेंड देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या योजनेद्वारे बेरोजगारीवर उपाय शोधून काढणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले आहे. अर्थसंकल्पात महिलांसाठी 'लाडकी बहीण' ही योजना जाहीर करण्यात आली होती. त्याअंतर्गत २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना शासनातर्फे दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. बहिणींसाठी योजना, मग लाडक्या भावांसाठी काय, असा प्रश्न विरोधकांनी त्यावर उपस्थित केला होता. मात्र आता राज्य सरकारने लाडक्या भावांसाठीदेखील योजना आणली आहे.

### अशी असणार प्रमुख अट?

जो तरुण १२ वी उत्तीर्ण झाला असेल, त्याला दरमहा सहा हजार रुपये दिले जातील. तर डिप्लोमा केलेल्या तरुणाला आठ हजार रुपये मिळतील. तसेच पदवीधर तरुणाला १० हजार रुपये महिन्याला दिले जातील. यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षांच्या दरम्यान असणे गरजेचे आहे. तसेच अर्जदाराचे बँक खाते हे आधार कार्डशी जोडलेले असले पाहिजे.

### कसा कराल अर्ज?

महाराष्ट्र सरकारच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्या. नवीन वापरकर्ता (छ्शु णीशी ठशसळीींरींळेप) नोंदणी पर्यायावर क्लिक करा. यानंतर तुम्हाला एक अर्ज दिसेल. त्या अर्जात तुमचे नाव, पत्ता आणि वयोगट भरा.तसेच त्या अर्जात तुम्हाला विचारलेली सर्व माहिती काळजीपूर्वक भरा. यानंतर त्यात नमूद केलेली आवश्यक कागदपत्र अपलोड करा. यानंतर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सबमिट बटणावर क्लिक करा. सबमिट बटणावर क्लिक केल्यानंतरच लाडका भाऊ योजना महाराष्ट्र २०२४ अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

## आरोग्य सेवेतुन सुद्धा ईश्वर सेवा घडते

आध्यत्मिक : अनिल जगताप यांनी व्यक्त केले विचार



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आषाढी एकादशीनिमित्त गजानन हॉस्पिटल च्या त्वचारोग तज्ञ डॉ. ऐश्वर्या खंडागळे यांचे काल दि. १७ जुलै रोजी श्री क्षेत्र नारायण गड ता. जि. बीड येथे मोफत त्वचारोग तपासणी, व उपचार शिबीर संपन्न झाले. या शिबिरास आशिर्वाद रुपी शुभेच्छा ह.भ.प. महंत शिवाजी महाराज मठाधिपती श्री क्षेत्र नारायणगड यांनी दिल्या, आषाढी एकादशीचे अवचित्य साधून श्री क्षेत्र नारायण गड येथे सकाळी १०.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत मोफत त्वचारोग तपासणी व उपचार शिबीराची उभारणी केली होती. सुप्रसिद्ध त्वचारोग व सौंदर्यशास्त्र तज्ञ श्री गजानन स्किन क्लिनिकच्या संचालक डॉ. ऐश्वर्या खंडागळे यांनी शिबिरात तब्बल १५७ रुग्णांची मोफत तपासणी करून मोफत औषध उपचार दिले.

या शिबिरात वारकरी, महिला, पुरुष, भाविक भक्तांसह पोलीस कर्मचारी यांनी पण उपचार घेतले. आषाढी एकादशी निमित्त घेण्यात आलेले, हे शिबीर अत्यंत महत्वाचे पान २ वर...

## डोंगरकिन्ही येथे चोरांचा धुमाकूळ

### बोंबला : अंमळनेर पोलिस म्हणतात सतर्कता बाळगा

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी
पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथे दि १६च्यामध्य रात्री चोरांनी धुमाकूळ घालुन चार घरात व एका किराणा दुकानात चोरांनी डल्ला मारत एका महिलेला चाकुचा धाक दाखवून गळ्यातील मंगळसूत्र व अंगठी ओरबाडून नेली आहे.परिणामी डोंगरकिन्ही परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

डोंगरकिन्ही येथे मध्यरात्री चोरांनी धुडगूस घातला होता.यात चोरांनी अमोल म्हस्के तलाठी हे सर्व एका नातेवाईकाच्या अंत्यविधीस गेले होते त्यांचा दरवाजा तोडुन पायातील पैंजण,चार्जर लंपास केले तर सुनिल दळवी यांच्या पेठेतील किराणा



दुकानात चोरांनी डल्ला मारला व गल्लयातील पंचवीस हजार लंपास केले तर मढगी जवळील स्वप्नील येवले यांचे बंद बंगल्याचे दार तोडून किंमती साड्या व दाढी करण्याचे साहीत्य लंपास केले पान २ वर...

सध्या पावसाळा सुरू असुन या वातावरणात ग्रामस्थ बाहेर पडत नाही.सहसा नागरीक शेजारी सुध्दा लक्ष देत नाहीत.परिणामी चोरांची शिरजोरी वाढली आहे.नागरीकांनी सतर्कता बाळगली पाहिजे.तसेच शक्य असेल तेथे सिसीटिव्ही बसवला पाहीजे.पोलीस अहोरात्र नागरीकांच्या गस्तीत आहेत.पाच ते सहा चोरांची ही गँग असु शकते.बंद घर असेल तर शेजारच्यांना कल्पना द्यावी.

–भार्गव सपकाळ, पोलिस निरीक्षक.अंमळनेर.

## आनंदऋषी नेत्रालयाकडून रुग्णांची तपासणी

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी
नगर येथील आनंद ऋषीजी नेत्रालय व जैन श्रावक संघ कडा यांच्यावतीने कडा येथे आयोजित करण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरात पंचाहत्तर रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

कडा येथे दर रविवारी आनंद ऋषीजी नेत्रालय व जैन श्रावक संघाच्या वतीने



नेत्र तपासणी तसेच अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, कडा येथे प्रत्येक रविवारी शिबिरात नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. रविवारी आयोजित शिबिरात पहिल्याच दिवशी पंचाहत्तर जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. या शिबिराचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान पान २ वर...

## ...थेट कलेक्टरांनाचं लावला फोन

अस्मानी : शेतकरी रंगनाथ काळे झाले आक्रमक



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी
सोयगाव मंडळात अतिवृष्टीमुळे खरिपाच्या पिकांच्या नुकसानी साठी आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रंगनाथ काळे यांनी बाधित शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पाहून बुधवारी थेट शेतीच्या बांधा वरून च जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना फोन करून नुकसानी चे पंचनामे कधी करतातं असा थेट सवाल जिल्हाधिकारी यांना करून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक झाले

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रंगनाथ काळे हे बुधवार (दि १७) सोयगावला आले यावेळी त्यांनी सोयगाव शहरातील पिकांची नुकसानी ची पाहणी केली यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी यांचेशी संपर्क साधून तातडीने नुकसानी चे पंचनामे करण्यासाठी सांगितले तसेच पीकविमा कंपनीच्या अधिकाऱ्यांचीही त्यांनी कान उघडणी करून बाधित शेतकऱ्यांच्या तातडीने ऑफ लाईन तक्रारी स्वीकारण्याची तंबी पिकविम्याचे अधिकाऱ्यांना दिली त्यामुळे बाधित पान २ वर...

## मंत्रिमंडळाचा विस्तार झाला पाहिजे, अन्यथा

राजकीय | शिंदे गटाच्या नेत्याचं मोठं विधान



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
राज्यात विधानसभेची निवडणूक दोन ते तीन महिन्यांमध्ये जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष तयारीलाही लागले आहेत. राजकीय नेते सध्या मतदारसंघाचा आढावा घेत आहेत. तसेच महाविकास आघाडी आणि महायुतीमधील पक्षांच्या जागावाटपाबाबतही सध्या खलबतं सुरु आहेत. मात्र, विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याचं बोललं जात होतं. मात्र, आता महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार होणार नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. यावर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते, आमदार संजय शिरसाट यांनी मोठं विधान केलं आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार झाला नाही तर अनेक आमदार नाराज होतील, असं वक्तव्य संजय शिरसाट यांनी केलं आहे. त्यांच्या या विधानामुळे चर्चांना उधाण आलं आहे.असं काहीही होणार नाही. आता ही बातमी हायकमांडच्या माध्यमातून आली की कोणत्या माध्यमातून आली हे माहिती नाही. मात्र, मंत्रिमंडळाचा विस्तार हा झाला पाहिजे. अन्यथा अनेक आमदार नाराज होतील. पण पान २ वर...

### अजित पवार गटाबाबत काय म्हणाले?

भारतीय जनता पक्षाने अजित पवारांना महायुतीत घेतल्याबद्दल संघाशी संबंधित असलेल्या विवेक या मराठी साप्ताहिकानेही आक्षेप नोंदविला. यावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले, आता ज्याच त्याचं हे मत आहे. ज्यावेळी युती होते, त्यावेळी आमच्या सारख्या व्यक्तींनी त्यावर काही भाष्य करणं योग्य नाही. वरिष्ठांनी घेतलेला निर्णय आम्हाला मान्य करावा लागतो. मग कुणामुळे फायदा झाला आणि कुणामुळे फटका बसला याचं गणित आम्ही मांडत नाही, असंही संजय शिरसाट म्हणाले.

## शेतकऱ्यांचे विमा,अनुदान जमा कधी?

समस्या : शेतकरी चिंताग्रस्त, बँक अधिकारी मस्त




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी
केज तालुक्यातील शेतकऱ्यांचे विमा व अनुदान डीसीसी बँक व इंडिया बँक यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा कधी करणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.कारण २०२३ – २०२४ चे शेतकऱ्यांचे पीक विमा, अनुदान डीसीसी बँक व इंडिया बँक यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहे नेमके पीक विमा, अनुदान गेले कुठे का डीसीसी बँक केज व इंडिया बँक केज यांचे गोडबंगाल कळायला साधन नाही.बीड जिल्हा मध्यवर्ती बँक ऑफ इंडिया यांनी व बीसीसी बँक केज यांनी केज तालुक्यातील शेतकऱ्यांना अनुदान व पीक विमा यांच्या पासून वंचित ठेवण्याचे ठरवले आहे का मध्येच काही काळाबाजार करण्यासाठी अनुदान, पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केलेला नाही असा ही प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना शेतकऱ्यांना उपस्थित होत आहे त्यामुळे डीसीसी बँक केज व इंडिया बँक केज यांनी त्वरित केज पान २ वर...

# नियामक नियमन

इतरांनी कसे वागावे यावर उच्चपदस्थांनी प्रवचने झोडण्यास अल्पकर्तृत्व पुरते. त्याचे दिवसागणिक अनेक नमुने आसपास पाहावयास मिळतील. आव्हान असते स्वत:च्या क्षेत्रातील कर्तव्यच्युतीची दखल घेण्याचे आणि उच्चपदस्थांस प्रिय; पण अयोग्य कृती दाखवून देण्याचे. हे आव्हान सर्वोच्च न्यायालय अलीकडे पेलताना दिसते ही मोठी दिलासा देणारी बाब. गेल्या आठवड्याच्या अखेरीस सर्वोच्च न्यायालयाच्या दोन स्वतंत्र पीठांच्या कृतीतून हा दिलासा मिळतो. व्यवस्थेविषयी बरे काही बोलावे, सांगावे असे अनुभव अधिकाधिक दुर्मीळ होत असताना सर्वोच्च न्यायालयाच्या या कृतींची दखल घेणे आणि तिचा प्रसार करणे आवश्यक ठरते.यातील पहिली घटना आहे ती न्या. अभय ओक आणि न्या. उज्ज्वल भुयान यांनी पटणा उच्च न्यायालयास खडसावले त्याची. या न्यायालयाने एका खून प्रकरणातील आरोपीस जामीन तर दिला; पण त्याच्या जामिनावरील मुक्तता सहा महिन्यांनी होईल अशी अट घातली. खरे तर यातील विरोधाभास लक्षात येण्यास न्यायपंडित असण्याचीही गरज नाही. तरीही आपल्या निर्णयातील खोट या न्यायाधीश महोदयांस लक्षात आली नाही. परिणामी सर्वोच्च न्यायालयाकडून बोलणी खाऊन घेण्याची वेळ उच्च न्यायाधीशांनी स्वत:वर आणली. ''हा काय प्रकार आहे? काही न्यायाधीशांकडून सहा महिने वा वर्षभर जामीन नाकारण्याचे प्रकार घडत असताना त्यात आता हा नवा नमुना'' असे म्हणत न्या. ओक यांनी या ''आभासी जामीन'' प्रकाराबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. 'आरोपी जामिनास पात्र आहे; पण तो त्यास सहा महिन्यांनी मिळेल' हे असे सांगणे कोणत्या कायद्यात बसते असा न्या. ओक यांच्या म्हणण्याचा अर्थ.

पाटणा उच्च न्यायालयाच्या या आदेशाची संभावना न्या. ओक 'अगदी विचित्र' (एक्स्ट्रीमली स्ट्रेंज) या विशेषणाने करतात. सर्वोच्च न्यायालयालाच आपल्या नियंत्रणाखालील उच्च न्यायालयाचे वर्तन 'अगदी विचित्र' वाटत असेल तर सामान्यांच्या न्यायाधीशांबाबतच्या भावना काय असतील हे समजून घेणे अवघड नाही. अलीकडे काही उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांवर कडकडीत आसूड ओढण्याची वेळ सर्वोच्च न्यायालयावर वारंवार येताना दिसते. गुजरात, पाटणा ही यातील काही उदाहरणे. आपणच ज्याचे नियंत्रण करतो त्या काही उच्च न्यायालयातील काही न्यायाधीशांची बौद्धिक कमअस्सलता सर्वोच्च न्यायालयास खरोखरच टोचू लागली असेल तर त्यातून परिस्थितीत काही सुधारणा होण्याची शक्यता निर्माण तरी होते. एरवी आपले कसे उत्तम सुरू आहे याची टिमकी स्वत:च वाजवणाऱ्यांची कमतरता आपल्याकडे नाही.या अशा मार्गदर्शक तत्त्वांची, त्यांच्या संहितेची आज कधी नव्हे इतकी गरज आहे. याचे कारण व्यवस्थेची मनमानी हा आपल्याकडे कायमचा चिंतेचा विषय राहिलेला आहे.

व्यवस्था राबवणाऱ्यांस ही मनमानी करता येते कारण नियमांच्या पालनापेक्षा सत्ताधाऱ्यांच्या लांगूलचालनात ही मंडळी धन्यता मानतात म्हणून. या अधिकाऱ्यांचे चांगभले सत्ताधीशांहाती असते आणि त्यांचे नियंत्रण करणारी यंत्रणा स्वायत्त नसते. अमेरिकी अध्यक्षांवर साधा पोलीस अधिकारी चौकशीचे समन्स बजावू शकतो आणि इंग्लंडमधे पंतप्रधानांच्या कार्यालयातील एक महिला कर्मचारी पंतप्रधानांनी करोनाकाळात पार्ट्या केल्याची साक्ष निर्भयपणे देऊ शकते. हे आपल्याकडे होणे नाही. येथे सत्ताधारी पक्ष कोणताही असो प्रशासकीय यंत्रणा राजकीय विरोधकांस नामोहरम करण्यासाठी वापरण्याकडेच सगळ्यांचा कल. मनमोहन सिंग, अटलबिहारी वाजपेयी इत्यादी काही मोजके अपवाद. अशा वातावरणात न्यायपालिका हाच शेवटचा आशेचा किरण. नियमांचे पालन करायचे की नाही हे निवडण्याचे 'स्वातंत्र्य' हे समाजहिताच्या व्यापक स्वातंत्र्याचा संकोच करते. तो होत नाही हे पाहणे ही नियामकांची जबाबदारी. ही जबाबदारीची जाणीव सतत तेवती राहावी यासाठी नियामकांचे नियमन गरजेचे ठरते.

# भारतीय न्याय संहिता ही काळाची गरज!



भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले त्या गोष्टीला आता ७५ वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला. पण १ जुलै २०२४ या दिवशी अशीच एक मोठी घटना घडली. भारतावर राज्य करणाऱ्या आणि भारताला गुलामीत ठेवणाऱ्या ब्रिटिशांनी त्यांच्या हितासाठी केलेली भारतीय दंड विधान ही कायदेप्रणाली पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने बदलली आणि नव्या युगातील भारताची नवीन भारतीय न्याय संहिता लागू केली.या नव्या न्याय संहितेत नेमकं काय बदललं आहे, हे जाणून घेण्याआधी भारतीय दंड विधानाचा थोडा इतिहासही माहीत करून घ्यायला हवा. ब्रिटिश सरकारने भारताचा ताबा घेण्याआधी ब्रिटनच्या संसदेने भारताचा कारभार ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती सोपवला होता. पण १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धानंतर ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीची सनद रद्द करून कारभार आपल्या हाती घेतला. १८६० मध्ये त्यांनी देशभर समान कायदे लागू करण्यासाठी भारतीय दंड विधानाला मंजुरी दिली. त्याचप्रमाणे १८७२ मध्ये भारतीय पुरावा कायदा आणि १८९८ मध्ये फौजदार प्रक्रिया संहिता लागू झाल्या. स्वातंत्र्यानंतरही हेच भारतीय दंडविधान देशभरात लागू झाले.अर्थात वेळोवेळी या कायद्यांमध्ये बदल होत गेले. पण प्रामुख्याने वसाहतवादी मानसिकतेतून आलेल्या या कायद्यांचा आराखडा सारखाच होता. डिसेंबर २०२३ मध्ये केंद्र सरकारने भारतीय दंड संहिता रद्द करत भारतीय न्यायिक संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता रद्द करून भारतीय नागरिक संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा कायदा रद्द करून भारतीय साक्ष अधिनियम लागू केला.एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, हे बदल फक्त नावांपुरते नाहीत, तर ते मानसिकतेतील बदल आहेत. त्याशिवाय तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीनंतर गुन्ह्यांचं स्वरूप बदललं आहे. ते व्यापक झालं आहे. फक्त गुन्हेच नाहीत, तर जीवनपद्धतीत आणि संस्कृतीतही बदल झाले आहेत. त्या अनुषंगानेही काही गोष्टी न्यायप्रणालीच्या कक्षेत येणं आवश्यक होतं.

केंद्र सरकारने केलेले हे नवे बदल त्या दृष्टीने मोलाचे आहेत, असंच म्हणायला हवं.सर्वांत आधी, या भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक संरक्षण संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम याद्वारे नेमके काय बदल झाले आहेत, ते बघू या. काही वर्षांपूर्वी दिल्लीतील जेएनयूत घडलेल्या काही घटनांमुळे राजद्रोह किंवा देशद्रोहाचा कायदा प्रचंड चर्चेत आला होता. तद्दन वसाहतवादी ब्रिटिश मानसिकतेतून आलेल्या या कायद्याची स्वतंत्र भारतात खरंच गरज आहे का, याबाबत ऊहापोह झाला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने आता हा कायदाच रद्द केला आहे. पण म्हणून लोकांना देशविघातक कृत्ये करण्याची मुभा नाही. त्यामुळेच ज्यांच्याकडून भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात येईल, त्यांना कठोर शिक्षा करण्याची तरतूदही या नव्या न्याय संहितेत आहे. आता काही जण म्हणतील की, देशद्रोहाचा कायदा आणि हा कायदा यात फरक काय? खरंतर हा प्रश्नच अनाठायी आहे. देशविघातक कृत्य घडत असेल, तर त्याला कठोरातील कठोर शासन व्हायला नको, असं या मंडळींचं म्हणणं आहे काय?सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे १ जुलै २०२४ पासून भारतीय दंड संहिता (१८६०), भारतीय पुरावा कायदा (१८७२) आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (१८९८) आता रद्दबातल झाल्या आहेत. त्यामुळे त्या पुन्हा लागू होऊ शकत नाहीत.

यापुढे कायद्याचं राज्य चालवायचं असेल, तर या नव्या भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम यांचा आधार घेऊनच चालावं लागणार आहे. कायदे कितीही चांगले असले, तरी त्यांचं यशापयश शेवटी ते कायदे राबवणाऱ्यांच्या मानसिकतेवर अवलंबून असतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची मानसिकता कायद्याचं राज्य करण्याचीच आहे. त्यामुळे या कायद्यांची यशस्वी अंमलबजावणी होईल, यात शंका नाही. याआधीही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतलेल्या अनेक धाडसी निर्णयांवर टीका झाली होती. पण कालपरत्वे हे निर्णय किती महत्त्वाचे होते आणि त्यामुळे आपल्या आयुष्यात कसा बदल झाला, हे सर्वांसमोर आहे. या नव्या कायदे संहितेबाबतही नेमकी हीच भूमिका विरोधकांनीही घेण्याची गरज आहे.

# शेतकऱ्यांनो, गायगोठे-विहिरीच्या वैयक्तिक लाभाचे पूर्ण पैसे घ्या

## अँड. अजित देशमुख: पैसे खात्यात मिळणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रोजगार हमी योजनेच्या वैयक्तिक लाभाच्या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना दिले जाणारे वैयक्तिक गाय गोठे आणि विहिरी यांचे पैसे ग्रामपंचायत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात देत नव्हते. आता ते पैसे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात देण्याचे आदेश गेवराई तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत यांना प्राप्त झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी सर्व लाभाचे पूर्ण पैसे घ्यावेत. आपल्या योजना पूर्ण कराव्यात. दलालांना एक रुपया देखील सोडू नये. शेतकऱ्यांनी कामे पूर्ण करावीत. दलालांना दिलेले पैसे देखील परत घ्यावेत, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

नियमाचे उल्लंघन करून पळवाटा शोधन्यामध्ये बीड जिल्हा महाराष्ट्रात नंबर एक वर आहे. मात्र आम्ही ज्या ठिकाणी हात घातला, त्या ठिकाणी प्रशासनाला उत्तर नसते. त्यामुळे गेवराई तालुक्यातील हा प्रकार ओळखण्यात आम्हाला यश आले. तालुक्यात अनेक गावात असे प्रकार आहेत. ते आम्ही प्रशासनाला कळवले आहेत. त्यामुळे धोंडराई सह अनेक गावे आता सरळ चालतील. या गावांना दोष देण्यापूर्वी खरी दोषी पंचायत समिती आहे. आता आमचे लक्ष जिल्ह्यातील अन्य तालुक्यांकडे आहे. शेतकऱ्यांच्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा, हा या मागचा उद्देश आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वैयक्तिक लाभाचा एक रुपया देखील सोडू नये. आणि आपल्या शेतात विहिरीचे आणि गाय गोठाचे काम पूर्ण करून स्वतःच्या विकासाला चालना करून घ्यावी. जर आपल्या शेतात विकास कामे झाली, तर त्याचा फायदा आज ना उद्या आपल्याला होणार आहे. विहिरीला पाणी वाढले तर निश्चितच पीक चांगले येईल. पिक चांगले आले तर निश्चितच गाय गोठ्यात दोनच्या ऐवजी चार गायी येतील. शेतकऱ्याची यात उन्नती होईल. त्यामुळे एक रुपया देखील लाच न देता आलेल्या सर्व पैशातून काम करून घ्यावे. रोहयोच्या योजना शेतकऱ्यांसाठी आहेत. आलेले पैसे किती दिवसात शेतकऱ्यांना द्यायचे, याचे नियम आहेत. जर मुदतीत पैसे दिले नाहीत, तर त्याचे व्याज अधिकाऱ्याच्या पगारातून वसूल करण्याचा नियम आहे. त्यामुळे वेळ लागू द्या, पण पैसा कोणाला देवू नका. जर कोणी लाच मागत असेल तर त्याची जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद यांच्याकडे तक्रार करा, असेही अँड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# नाविन्यपुर्ण उपक्रमांमुळे बंदीवानांमध्ये नवचैतन्य-अमिताभ गुप्ता

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

कारागृहातील बंद्यांच्या सुख-सोयीसाठी नाविन्यपुर्ण विविध योजना राबविण्यात आल्या. नन्हे कदम, गळाभेट, दुरध्वनी योजना, वॉशिंग मशिन, वॉटर प्युरीफाइड्, सीसीटीव्ही यंत्रणा, भजन स्पर्धा, शेती उत्पादन वाढीसाठी विशेष प्रयत्न केले. अशा नाविन्यपुर्ण योजनामुळे बंदीवानांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे प्रतिपादन मावळते अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी केले आहे. कारागृह विभागाने तयार केलेल्या परिवर्तन कॉफी टेबल बुकचे अनावरण गुप्ता यांनी कारागृह मुख्यालयात केले. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.जालिंदर सुपेकर उपस्थित होते.




अमिताभ गुप्ता म्हणाले, कारागृहातील बंद्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाने वेळोवेळी प्रयत्न केले आहे. विशेषतः कारागृहातंर्गत स्वच्छता, बंद्यांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित केले होते. त्यामुळे बंदीवानांच्या आरोग्यामध्ये सुधारणा होवून आजारपणाचे प्रमाण घटण्यास मदत झाली. प्रामुख्याने, या विभागात काम करताना नाविण्यपुर्ण उपक्रमांची सुरुवात केल्याचा आनंद आहे. अधिकार्यासह कर्मचार्यांनी तत्परतेने सर्व उपक्रमांची अंमलबजावणी केली. त्याचा फायदा कारागृह विभागाला झाला असून, आगामी काळातही बंद्यांना उपक्रमांचा फायदा होणार आहे. बंदीवानांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. त्याअनुषंगाने कारागृहांतर्गत विविध सोयी - सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. जालिंदर सुपेकर म्हणाले, राज्यभरातील बहुतांश कारागृहातंर्गत सुरु केलेल्या विविध उपक्रमाद्वारे बंद्यांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण झाली आहे. त्याचे संपूर्ण श्रेय गुप्ता साहेबांचे असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजनांचा पाठपुरावा योग्य वेळेत केला. त्यामुळेच कारागृहातंर्गत बंदीवानांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक पातळीवरील योजनांची अंमलबजावणीही तितक्याच तत्परतेने संबंधित अधिकार्यांनी पार पाडली. बंदीवानांमध्येही आत्मीयता निर्माण करण्यासाठी उपक्रमांचा फायदा झाला आहे. त्यांनाही भौतिक गरजा मिळवून देण्यासाठी प्रशासनाने प्राधान्य दिल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार सुपेकर यांनी मानले. राज्यभरातील कारागृहांतर्गत बदल, बंदीवानांसाठी राबविण्यात आलेल्या योजना, उपक्रमांची माहिती, महाराष्ट्र कारागृह विभागाने तयार केलेल्या परिवर्तन कॉफी टेबल बुकद्वारे मांडण्यात आली आहे. कॉफी टेबल बुकचे अनावरण अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी केले.

१८ डिसेंबर २०२२ रोजी कारागृह विभागाचा पदभार स्वीकारल्यापासून ते १५ जुलै २०२४ कालावधीत विविध उपक्रमांचा घोषवारा परिवर्तन कॉफीटेबल बुकच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे.

## पान एक वरून

**आरोग्य सेवेतुन...**

फठरले असून वारकरी, भाविक भक्त व ग्रामीण भागातील लोकांना याचा खुप चांगल्या पद्धतीने लाभ घेता आला, या शिबिरासाठी प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांची होती. याबरोबरच बळीराम गवते, भगवानराव गवते, डॉ. अमोल खंडागळे पुजा ताई मोरे, सुनिल भाऊ अनभुले, सुनिल गवते यांची देखील उपस्थिती लाभली होती. या शिबिराचे आयोजन चंद्रसेन खंडागळे तसेच सामाजिक कार्यकर्ते विनोद चव्हाण यांनी केले होते व या पुढे हि समाज हितासाठी असे आणखी आरोग्य शिबिरे घेण्याचा संकल्प केला

**डोंगरकिन्ही येथे...**

तर माजी पंचायत समिती सदस्य विद्याधर येवले यांचा बंद बंगल्याचे गेट तोडले मात्र येवले यांचा परिवार हा मुंबई येथे राहात असल्याने घरात काहीही नव्हतं.येथुन चोरांनी नागनाथ भारती यांच्या घरावर मोर्चा वळवला दारतोडुन घरात प्रवेश केला तेव्हा घरात असलेल्या एका महिलेला चाकुचा धाक दाखवून गळ्यातील मंगळसूत्र व सोन्याची अंगठी ओरबाडून काढली.विशेष म्हणजे डोंगरकिन्ही गावात चोरांचा अडीच तास धुमाकूळ घातला तरीही नागरिकांना थांगपत्ता लागला नाही.या प्रकारानंतर सरपंच आण्णासाहेब येवले यांना समजल्यानंतर अंमळनेर पोलीसांना कळविण्यात आले.अंमळनेर पोलिस निरीक्षक भार्गव सपकाळ यांनी तात्काळ रात्री तीन वाजता भेट देऊन प्रत्यक्ष पहाणी करुन ग्रामस्थांना धीर दिला.बीड शहरातील मोकाट चोरांच्या बातम्या मुळे अगोदर दहशत असताना या चोरांच्या धुडगूस मुळे डोंगरकिन्ही परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**...थेट कलेक्टरांनाचं लावला...**

शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे सोयगाव शहरालगत असलेल्या सोनसवाडी शिवारातील परिस्थिती तर खूप भयानक झालेली आहे तरी शासन पंचनामे करायला टाळाटाळ करत आहे अशी तक्रारी बाधित शेतकऱ्यांनी रंगनाथ काळे यांच्याकडे केल्या होत्या यावेळी अरुण सोहनी,विकास देसाई,प्रकाश देसाई,ढगे राष्ट्रवादी चे शहराध्यक्ष .रवी काळे तालुका काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र काळे , तुकाराम पाटील कळम , प्रमोद पाटील, अनिल मानकर , माजी तालुकाध्यक्ष दिपक देशमुख आदि उपस्थित होते.

**आनंदऋषी नेत्रालयाकडून...**

तांबोळींसह उपसरपंच दीपक कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष रतिलाल कटारिया, अमोलक जैन शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा, ग्रामपंचायत सदस्य बिपिन भंडारी, पत्रकार राजेंद्र जैन, सुनील देशमुख, अजय चोरबेले , प्रकाश मुनोत यांच्यासह नेत्र रुग्णालयाचे किरण कवडे, नेत्र विशारद भागवत वीर व इतर मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात ७५ जणांची तपासणी करण्यात आली. त्यातील सात जणांना नंबरचे चष्मे देण्यात आले. तर सहा रुग्णांवर नगर येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या शिबिराला पहिल्याच दिवशी उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

**शेतकऱ्यांचे विमा,अनुदान...**

तालुक्यातील शेतकऱ्यांना अनुदान व पीक विमा रक्कम खात्यात जमा करावी केज तालुक्यातील शेतकऱ्यांना टोकाची भूमिका घेण्याची वेळ इंडिया बँक व डीसीसी बँक केज यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी येऊ देऊ नये अशी मागणी केज तालुक्यातील शेतकऱ्यांन कडुन व्यक्त करण्यात येत आहे .फ

**मंत्रिमंडळाचा विस्तार...**

मंत्रिमंडळाचा विस्तार करायला काय हरकत आहे? मात्र, मंत्रिमंडळाचा विस्तार होणार नाही असं होणार नाही तर मंत्रिमंडळाचा विस्तार हा होईल, असं संजय शिरसाट यांनी म्हटलं. ते टिव्ही ९ मराठीशी बोलत होते.

## पान सहा वरून

**आषाढीनिमित्त शिवसेनेकडून भाविकांसाठी...**

वाटप सुरु करण्यात आले होते. यांप्रसंगी शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येत महाप्रसादाचा लाभ घेतला. जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी स्वतः उपस्थित नागरिकांना फराळ वाटप केले. याप्रसंगी उपस्थित असणाऱ्या बीडमधील भक्त भाविकांना अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान बीड शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे...**

साठे विकास महामंडळ (मर्या.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, नगर रोड जिल्हा कार्यालय बीड येथे ऑफलाइन पद्धतीने बुधवार दि. २४ जुलै २०२४ पर्यंत अर्ज भरावे, असे अवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.). जिल्हा व्यवस्थापक व्हि. एस. सोनवणे, यांनी केले आहे.

**जातीवाचक शिवीगाळ...**

दिपा बंकटी तारुकर आणि रामभाऊ दगडुबा तारुकर सर्व (रा. कळंबअंबा ता. केज ) या आठ जनांच्या विरुद्ध युसूफवडगाव पोलीस ठाण्यात १६८/२०२४ ट्रॉसिटी कलम ३(१)(आर), ३(१) (एस), ३(२) (व्हीए) यासह भा.न्या. सं. ११५(२), ११८(१), १८९(२), १९०, २९१(२) ९११(३), ३५१(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक कमलेश मीना हे तपास करीत आहेत.

**पदोन्नतीचा प्रस्ताव...**

मध्यवर्ती परिसरातील अधिकारी व कर्मचारी यांनी उपोषणकर्तेचा विरोधात मुकमोर्चा काढला होता त्या मोर्चा ला प्रतिउत्तर डॉ अहिरे यांच्या समर्थनार्थ प्रतिमोर्चा काढण्यात येणार होता परंतु कुलगुरू व कुलसचिव यांनी पुढाकार घेऊन सकारात्मक भूमिका घेतल्याने वातावरण निवळले

**परळीमध्ये प्रभागनिहाय...**

यावेळी युवती शहराध्यक्षा वर्षाताई दहिफळे, युवक नेते अमित केंद्रे,अभिजीत धाकपाडे,बळीराम नागरगोजे,ज्ञानेश्वर होळंबे,अनिल कदम,प्रदीप जाधवर,उमेश दहीफळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**पालकांना अडचणीत...**

मोबाइलद्वारे केवळ आर्थिकच नव्हे, तर विविध मागनि अडचणीत आणण्याचे प्रयत्न होतात. म्हणून मोबाइलचा काळजीपूर्वक वापर करून कायद्याचे पालन करावे.विद्यार्थिनींना कसल्याही प्रकारची अडचण असल्यास पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले. त्यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे शंकानिरसन केले. या वेळी जमादार सानप व मोरे यांनी प्रत्येक आधुनिक शस्त्राची माहिती विद्यार्थ्यांना दिली. गोरख फड यांनी वाहतुकीच्या नियमांची माहिती सांगून विद्यार्थ्यांनी स्कूल बसच्या बाहेर हात काढणे, डोके काढणे या बाबी टाळाव्यात, असे सांगितले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# नळकांडी पुलाचा प्रश्न लागला मार्गी!

**आ.संदीप क्षीरसागर** | **अखेर पाठपुराव्याला यश**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील भानकवाडी येथे नळकांडी पुलासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. या कामासाठी मंजुरी आणि निधी दिल्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा परिषद आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील भानकवाडी ता.शिरूर-कासार येथील भानकवाडी ते साळुंकेवस्ती रस्त्याच्या दरम्यान रोंद नदी आहे. मात्र या नदीवर पूल नाही. त्यामुळे गावकऱ्यांना पाण्यातूनच ये-जा करावी लागते. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी भानकवाडी ते साळुंके वस्ती रस्त्यावर नळकांडी पुल होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत होते. प्रत्येक अधिवेशन, जिल्हा नियोजन समितीची प्रत्येक बैठक यांमध्ये हा महत्त्वाचा मुद्दा आ.क्षीरसागर यांनी उपस्थित केलेला आहे. आता या महत्त्वाच्या असलेल्या कामास मंजुरी आणि निधी मिळाला आहे. त्यामुळे येथील शेतकरी आणि नागरिकांचा जीवनावश्यक असलेला प्रश्न मार्गी लागला असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा परिषद आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.

### दोन वर्षांपूर्वी झाला होता तीघांचा मृत्यू

दरम्यान याठिकाणी १० ऑक्टोबर २०२२ रोजी अत्यंत दुर्दैवी घटना घडली होती. याठिकाणी अतिवृष्टी झाल्याने आलेल्या पुरात दोन लहान मुली व एका तरूणाचा पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला होता. त्यामुळे याठिकाणी पूल होणे या भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांसाठी जीवनावश्यक झाले होते. अशा प्रकारची जीवीत हानी पुन्हा होऊ नये म्हणून आ.संदीप क्षीरसागर यांनी नळकांडी पुलाचा प्रश्न शासनदरबारी लावून धरला होता. भानकवाडी ते साळुंके वस्ती रस्त्यावर नळकांडी पूल बांधण्यात यावा, या मागणीसाठी आ.क्षीरसागर प्रत्येक अधिवेशन आणि प्रत्येक जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आक्रमक भूमिका घेत होते. परंतु शासनाकडूनही यावर उपाय न झाल्याने शेवटी आ.क्षीरसागर यांनी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती.





# विठू-माऊलीच्या पोषाखात जमला मेळा

**अध्यात्मिक : केएसपी विद्यालयात आषाढी एकादशी**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयात आषाढी एकादाशी निमित्त लहान मुलांची दिंडी उत्साहात संपन्न झाली. काही विद्यार्थी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशात आले होते तर काही विद्यार्थी वारकरी पेहरावात आले होते...या छोट्या वारकऱ्यांनी हातात टाळ आणि डोक्यावर तुळस, हरी नामाचा गजर केला...विद्यार्थ्यांचे ते मनमोहक रूप साक्षात विठ्ठल रुक्मिणी च्या रुपाची आठवण करून देत होते..अतिशय उत्साहात विठ्ठल नामाच्या गजरात मुलांची दिंडी काढण्यात आली.जय हरी विठ्ठल नामाचा गजर करत मुलांची दिंडी शाळे जवळील मंदीरात जाऊन संपन्न झाली. यावेळी मुलांना फराळ वाटप करण्यात आला. आपल्या भारतीय सण, उत्सव, समारंभ संस्कृतीचे जतन करणे हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच कार्यक्रमाचे मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत आषाढी दिंडी साजरी करण्यात आला.

# किड प्रादुर्भावामुळे सोयाबीन संकटात

**डॉ.गणेश ढवळे: स्थळ पंचनामे करण्याची मागणी**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयाबीन पिक शेतकऱ्यांसाठि आर्थिक दृष्ट्या महत्वाचे असुन खरीप हंगामात पावसाला चांगली सुरुवात झाली आहे.

सध्या सगळीकडे सोयाबीन वाढीच्या अवस्थेत असताना सतत पाऊस व ढगाळ वातावरण यामुळे सोयाबीन पिकांवर मोठ्या प्रमाणात पाने खाणाऱ्या खोडमाशी ,चक्रीभुंगा, विविध उंटअळ्या,तंबाखुवरील पाने खाणारी अळी,केसाळ अळ्या, तुडतुडे,पांढरी माशी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.तर काही ठिकाणी पिवळा मोझक विषाणूंमुळे सोयाबीनचे पिक अचानक पिवळे पडणे,वाळणे आदि लक्षणे आढळुन येत आहेत.त्यामुळे उत्पादनात मोठी घट होऊन सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत.

कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी स्थळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची मागणी लिंबागणेश येथील अर्जुन गिरे, रामकिसन गिरे, चंद्रकांत आवसरे, श्रीहरी निर्मळ, सर्जेराव मुळे,सुदाम मुळे, रामदास मुळे, समाधान मुळे, अझीम सय्यद यांनी केली आहे.



# नारायण विद्यालयामध्ये दिंडी उत्साहात

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त मुलांची दिंडी उत्साहात संपन्न झाली. काही विद्यार्थी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशात आले होते तर काही विद्यार्थी वारकरी पेहरावात आले होते.या छोट्या वारकऱ्यांनी हातात टाळ आणि डोक्यावर तुळस, गळ्यात तुळशीच्या माळा घालून हरी नामाचा गजर केला.

विद्यार्थ्यांचे ते मनमोहक रूप साक्षात विठ्ठल रुक्मिणी च्या रुपाची आठवण करून देत होते.अतिशय उत्साहात विठ्ठल नामाच्या गजरात मुलांची दिंडी काढण्यात आली.जय हरी विठ्ठल नामाचा गजर करत मुलांची दिंडी खामगाव , आहेर चिंचोली, तांदळवाडी येथील मंदीरात जाऊन संपन्न झाली.

खामगाव गावात खामगाव मित्र मंडळाने विद्यार्थ्यांना चहा पाण्याची व्यवस्था केली होती तर तांदळवाडीतील प्रतिष्ठित पालक श्री लक्ष्मण काशीद, श्री अनिल काशीद या पालकांनी चहापाणी केले तर श्री अमोल तुपे, श्री काकासाहेब पवळ यांनी विद्यार्थ्यांना नाष्टा व चहा पाण्याची व्यवस्था केली.

श्री नारायण विद्यालयाचे सचिव तथा मुख्याध्यापक श्री अमोल काळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

दिंडीत श्री नारायण विद्यालयाचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, प्राध्यापक श्री अशोक घरत, प्रा.श्री गणेश मस्के, श्री चव्हाण वाय. डी, श्री पौळ डी.बी, श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी ,सौ. भुतावळे बि. आर , कदम एस .व्ही, श्री पवार पी .एल, श्री रकटे बी. आर, श्री मुरमुडे ए .एन , करपे सर, शेख सर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी पालक, शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पाच हजार भाविकांना फराळ वाटप

**नियोजन : केएसके महाविद्यालयाचा उपक्रम**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांचे मार्गदर्शनाने देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त बुधवार दि १७ रोजी बीडहून श्रीक्षेत्र नारायणगड संस्थान येथे दर्शनासाठी जाणाऱ्या तसेच परतणाऱ्या सर्व भाविक भक्तांसाठी प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही सौ.के. एस. के.(काकू) अन्नतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे मोफत फराळ वाटपाची व्यवस्था करण्यात आली. यावेळी फराळासाठी साबुदाणा खिचडी, शाबु चिवडा, बटाटा वेफर्स आणि केळी वाटप करण्यात आले. यानिमित्त बीड शहर आणि परिसरातून आलेल्या पाच हजार पेक्षा जास्त भाविक महिला आणि पुरुष तसेच युवकांनी या फराळाचा लाभ घेतला.याप्रसंगी याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बनविलेले पदार्थ बटाटा वेफर्स,बटाटा चिवडा आणि सीताफळ रबडी या उत्तम प्रतीच्या पदार्थांचे वाटप करण्यात आले.या सर्व वाटपाचे नियोजन संस्थेचे सहसचिव डॉ.गोविंद साळुंके आणि महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने येणाऱ्या जाणाऱ्या सर्व भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसह करण्यात आले.विशेष बाब म्हणजे बसने प्रवास करणाऱ्यासह इतर सर्व वाहने थांबवून भाविकांनी याचा लाभ घेवून मोफत फराळ वाटप केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. अशा प्रकारे या महाविद्यालातर्फे सातत्याने वेळोवेळी सामाजिक उपक्रम राबविले जातात.

# आषाढी एकादशी निमित्त ज्योती डक यांच्यावतीने फळांचे वाटप

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज दि. १७ जुलै रोजी राज्यभर आषाढी एकादशी साजरी केली जात आहे. या निमित्ताने जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य ज्योतीताई नारायणराव डक यांच्यावतीने तालुक्यातील विविध ठिकाणी भाविकांना फळांचे वाटप करण्यात आले. ज्योतीताई डक यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक आणि स्वागत होत आहे.

आषाढी एकादशी ही सबंध महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस असतो. या दिवशी आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविक पंढरपूर येथे जमा होतात. ज्यांना पंढरपूरला जाणे शक्य होत नाही असे सर्वजण आपल्या जवळच्या मंदिरात जाऊन पूजा अर्चा करीत विठ्ठलाकडे साकडे घालतात.

या दिवशी सर्वजण भक्तिभावाने दिवसभराचा उपवास करतात. या निमित्ताने आपली सामाजिक जबाबदारी जपत जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य ज्योतीताई नारायणराव डक यांनी मंगलनाथ मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, आणि केशवराज मंदिर, पुरुषोत्तम पुरी येथे जाऊन भाविकांसाठी फळांचे वाटप केले.

यावेळी जमलेल्या शेकडो भाविकांनी ज्योतीताई डक यांनी दिलेल्या फळांचा आस्वाद घेत समाधान व्यक्त केले. दरम्यान, ज्योतीताई डक यांच्याकडून अशा पद्धतीचे नियमित सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यांनी राबविलेल्या आजच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# महिलेची हत्या करणाऱ्यांना फाशी द्या

**गोरख काळे : खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शीळ गावातील घोळ गणपती मंदिर परिसरात एका ३० वर्षीय विवाहित महिलेवर तीन नराधमांनी सामूहिक बलात्कार करून तिचे डोके जमिनीवर आपटून निर्गुण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे या घटनेतील तीनही आरोपींना पोलिसांनी अटक केल्याची माहिती शीळ डायगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे त्या तीन नराधमांना पोलीस ठाण्यामध्ये आणून सखोल चौकशी केली असता मुंबईत राहणाऱ्या तीन नराधमांनी १) श्याम सुंदर शर्मा २) संतोष कुमार मिश्रा ३) राजकुमार पांडे या तिन्ही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा त्या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी या खटल्यात महाराष्ट्रातील निष्णांत कायदेपंडित वकिलांची नेमणूक करावी पीडित कुटुंबांची मुख्यमंत्री गृहमंत्री कलेक्टर पोलीस आयुक्त महिला आयोग यांनी भेट देऊन मदत व सांत्वन करावे पीडित कुटुंब हे अत्यंत दहशतीखाली आहे त्या पिढीत

महिलेला चार वर्षाचे लहान मुल आहे त्यामुळे त्या लहान मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने घ्यावी पीडित मुलगा सज्ञान होताच त्याला सरकारी नोकरी देण्यात यावी अशी मागणी मांगारूडी समाजाचे जिल्हा अध्यक्ष गोरख काळे यांनी केली आहे अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल,असा इशारा दिला आहे.



**अध्यात्मिक** | **आषाढी एकादशीनिमित्त भक्तीचा मेळा**

# अमोलक जैनच्या प्रांगणात रिंगण सोहळा!

प्रा. शुभम तांगडे/कडा

याची देह , याची डोळा, आज पाहिला रिंगण सोहळा !! होता टाळ-मृदंगाचा ध्वणी,हरिनामाच्या जयघोषाने गेले रिंगण रंगुनी !!ज्ञानोबा..माऊली..तुकाराम... असा आकाशाला गवसणी घालणारा आवाज... टाळ- मृदंगाचा गजर... डौलाने फडकणा-या भगव्या पताका अन् देहभान विसरुन नाचणारे बालगोपाळ अशा चैतण्यदायी वातावरणात अमोलक शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला विठू माऊलींचा जयघोष करीत जैन साध्वी मधूर व्याख्यानी विश्वदर्शनाजींसह कीर्ती सुधाजी मसा यांच्या उपस्थितीत दिंडी व रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात मंगळवारी सकाळी पार पडला.

आषाढी एकादशीनिमित्त कडा येथील अमोलक जैन शिक्षण संस्थेच्या प्रांगणात मंगळवारी सकाळी बालगोपाळांचा दिंडी सोहळा संपन्न झाला. विठ्ठल- रुक्मिणीसह डोक्यावर तुळशी वृंदावण, भगव्या पताका अन् हातात टाळ अशी वारकऱ्यांची वेषभुषा साकारुन विठ्ठल नामाचा जयघोष करीत विठ्ठल नामाची शाळा भरली. तहान, भूक विसरुन राज्यातून लाखो वारकरी पंढरीच्या सावळ्या विठुरायाच्या दर्शनासाठी पालख्या पंढरीच्या दिशेने रवाना होतात. आषाढी एकादशी आणि विठु माऊलीचे विशेष महत्त्व शाळेतील लहानलहान विद्यार्थ्यांना समजावे, हाच अध्यात्मिक उद्देश डोळ्यासमोर ठेवून येथील अमोलक जैन शिक्षण संस्थेच्या शिक्षक, विद्यार्थ्यांकडून आषाढी एकादशी निमित्त बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वृक्षदिंडी, रिंगण सोहळा, फुगडी असे विवध उपक्रम घेण्यात आले. शाळेच्या लहानग्या बालगोपांनी विठुनामाचा जयघोष करत दिंडीत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या बाल दिंडी सोहळ्या यशस्वीतेसाठी अमोलक संस्थेच्या विविध विभागातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी जैन साध्वी विश्वदर्शनाजी मसा यांनी चिमुकल्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देत शुभाशिर्वाद दिले. याप्रसंगी अमोलक जैन शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# संस्कृती विद्यालयात आषाढी एकादशी

**धोरण : पारंपारिक व धार्मिक पद्धतीने उत्साह**



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना संस्कार तसेच आपली संस्कृती आणि परंपरा याबाबतही जागृत करते .

आज संस्थापक अध्यक्ष डॉ . दत्ता नलावडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन खेडकर मॅडम यांनी केले होते .

अत्यंत सुरेख पद्धतीने सुरुवातीला दिंडी काढण्यात आली . त्यानंतर गोल रिंगण तसेच फुगडी ,पावली असे दिंडीतील उपक्रम घेण्यात आले . सर्व वातावरण भक्तीमय झाले होते .ज्ञानोबा तुकाराम ,पंढरीनाथ महाराज की जय याचा जयजयकार चालू होता .श्री .राम हळनर सर यांनी आषाढी एकादशी बद्दल माहिती मुलांना दिली .आपण आषाढी एकादशी का साजरी करतो आणि याचं धार्मिक महत्त्व काय या विषयावर डॉ . दत्ता नलावडे सरांनी मुलांना मार्गदर्शन केले .एकूणच आजचा आषाढी एकादशीचा कार्यक्रम खूप उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला .

**सुविचार** - यश मिळवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आत्म नियंत्रण.

# शेतकऱ्यांना आशा....!

लोकसभा निवडणुकीत मोदी सरकारच्या अहंकाराला जबरदस्त ठेच लागली, या हादऱ्यामुळे एरवी हवेत वावरणारे हे सरकार आता जमिनीवर उतरून जमिनीवरील वस्तुस्थितीचा विचार करेल, ही आशा या देशातल्या शेतकऱ्यांना वाटत आहे. त्यामुळेच लवकरच सादर होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पाकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागलेले आहे. शेतकऱ्यांचा पाठिंबा गृहीत धरून नफेखोर उद्योजकांच्या हिताचे निर्णय घेण्याचे काम गेली काही वर्षे सातत्याने सुरू होते; परंतु या लोकसभा निवडणुकीत समाजातील इतर घटकांसोबतच शेतकऱ्यांनीही मोदी सरकारला जबरदस्त झटका दिला आणि मोदी सरकार भानावर आले, असे म्हणावे लागेल. यावेळी मोदींनी प्रथमच एका खऱ्या अर्थाने अभ्यासू, उपक्रमशील आणि शेतकऱ्यांशी नाळ जुळलेल्या नेत्याकडे कृषी मंत्रालयाचा कारभार सोपविला. हा पहिला चांगला संकेत म्हणावा लागेल. मध्य प्रदेशाचे दीर्घकाळ मुख्यमंत्रिपद भूषविणाऱ्या शिवराज चौहाण यांच्याकडे आता कृषी मंत्रालयाची जबाबदारी आहे. त्यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात मध्य प्रदेशात शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक चांगले उपक्रम राबविले, कदाचित म्हणूनच देशातील इतर अनेक राज्यांमध्ये भाजपला दणका बसत असताना मध्य प्रदेशमध्ये मात्र भाजपने यावेळी सगळ्याच्या सगळ्या जागा जिंकल्या. देशभरातील शेतकऱ्यांना आता शिवराज चौहाणांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. केवळ कृषिमंत्र्यांकडूनच नाही तर अर्थमंत्र्यांकडूनही शेतकरी मोठ्या अपेक्षा बाळगून आहेत. भारताची अर्थव्यवस्था अजूनही मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्राशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जुळलेली आहे, अजूनही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा कृषी क्षेत्रच आहे. मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करण्याची क्षमतादेखील कृषी क्षेत्रातच आहे; परंतु सरकारच्या सातत्यपूर्ण दुर्लक्षामुळे या क्षेत्राचा विकास खूप मागे पडला आहे. सरकारकडून अनेक प्रयत्न केल्याचे भासविले जात असले तरी शेती आणि शेतकऱ्याची अवस्था फारशी सुधारलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषासोबतच निराशादेखील पसरत चालली आहे. शेतकऱ्यांची ही निराशा दूर करायची असेल तर आगामी अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी भरीव तरतूद करणे गरजेचे आहे. केंद्र सरकार गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवित असले तरी या घातल्या पाण्याने शेतकऱ्यांच्या समृद्धीची गंगा वाहू शकत नाही, ही वस्तुस्थिती सरकारने समजून घेणे गरजेचे आहे. सरकारच्या अथक प्रयत्नानंतरही मागच्या आर्थिक वर्षात कृषी क्षेत्राच्या विकासाचा दर अवघा १.८ टक्के राहिला. विशेष म्हणजे गेल्या सात वर्षातील हा निच्चांकी दर होता. देशाचा सकल विकास दर एकीकडे ८.२ टक्के असताना देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या कृषी क्षेत्राचा विकास दर धड दोन टक्केही नसणे, हे सरकारचे प्रयत्न योग्य दिशेने होत नसल्याचेच द्योतक म्हणावे लागेल. शेतीचे अर्थकारण अतिशय बेभरवशाचे झाल्यामुळे सामान्य शेतकरी कोणतीही जोखीम घ्यायला तयार नसतो, त्यामुळे काही मोजक्या पिकांचेच मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. त्याचा परिणाम काही उत्पादनाच्या उपलब्धतेवर होतो. भारत सरकारने मागच्या काळात मोठ्या प्रमाणात डाळी आयात केल्या, कारण डाळींचे देशांतर्गत उत्पादनच घटले होते, ते घटण्यामागे डाळवर्गीय पिकाला योग्य दर न मिळणे हे एक मुख्य कारण होते. डाळीचे उत्पादन शेतकऱ्यांसाठी आतबट्ट्याचा व्यवहार ठरत होता. आता अगदी अलीकडच्या काळात सरकारने देशभरातील शेतकऱ्यांकडून मूगडाळ किमान हमी भावात खरेदी करण्याची घोषणा केली आहे, त्यामुळे शेतकरी आश्वस्त होऊन मूगाचे पीक घेऊ शकतील. आर्थिक सुरक्षेची काही प्रमाणात जरी हमी मिळत असेल तर शेतकरी नक्कीच वेगवेगळे प्रयोग आपल्या शेतात करतील, त्यातून पिकांचे वैविध्य तर वाढेलच शिवाय अनेक उत्पादनाच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण होण्यास मदतही होईल. पारंपरिक शेतीसोबतच पुरक व्यवसाय करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, त्यासाठी सरकारकडून आर्थिक मदत अपेक्षित आहे, त्याची तरतूद येत्या अर्थसंकल्पात होईल, ही आशा करायला हरकत नाही. सध्या सरकारकडून एक एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबवली जात आहे. ज्यामध्ये मासिक तीन हजार पेन्शन दिली जाते. या पेन्शन योजनेला अटल पेन्शनशी जोडून कोट्यवधी शेतकऱ्यांना फायदा सरकार देऊ शकते. या अर्थसंकल्पात किमान वेतनाप्रमाणे एमएसपी निश्चित होणे अपेक्षित आहे. त्यामुळे बाजारातील चढ-उतारांचा धोका कमी होऊ शकतो, शिवाय पंतप्रधान पीक विमा योजनेची व्याप्तीतील वाढ या अर्थसंकल्पात अपेक्षित आहे.

# भेटीगाठींचे गूढ....!

लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीने दमदार कामगिरी केली, हा परिणाम विधानसभा निवडणुकीपर्यंत टिकेल आणि विधानसभेतही महाविकास आघाडी अशीच कामगिरी करीत राज्यात पुन्हा एकदा सत्ता हस्तगत करेल, हा आत्मविश्वास महाविकास आघाडीचे बहुतेक सगळेच नेते जाहीर वक्तव्यातून व्यक्त करीत असले तरी अतिआत्मविश्वासामुळे काय गत होते, याचे ज्वलंत उदाहरण भाजपच्या रूपाने त्यांच्या समोर नक्कीच आहे. जाहीर वक्तव्यातून ही नेतेमंडळी विजयाचा आत्मविश्वास व्यक्त करीत असली तरी विधानपरिषद निवडणुकीत जे काही घडले त्यामुळे विधानसभेची पुढची लढत अगदीच एकतर्फी नसेल याची जाणीव या मंडळींना असावी किंवा नसेल तर ती त्यांनी करून घ्यायला हरकत नाही. आपल्या शेवटच्या अर्थसंकल्पात महायुती सरकारने जो काही दौलतजादा केला आहे, तो निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच केला आहे. त्यापैकी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना 'गेमचेंजर' ठरू शकते. शिवाय एकदा जबरदस्त ठेच खाल्ल्यामुळे भाजप आता चांगलाच सावध झाला आहे. लोकसभा निवडणुकीत स्ट्राइक रेटच्या बाबतीत उद्धव ठाकरे गटावर मात करणारा शिंदे गटदेखील आता अधिक आत्मविश्वासात वावरत असल्याचे दिसते. अजित पवार लोकसभेत बसलेल्या धक्क्यातून सावरले आहेत. बारामतीत त्यांनी मोठे शक्तिप्रदर्शन केले. एकाच चुकीसाठी कुणी दोन वेळा शिक्षा देत नाही, त्यामुळे लोकसभेत झाली ती शिक्षा पुरेशी आहे, आता विधानसभेत दादांना साथ द्यायला हवी, ही भावना आपल्या मतदारांमध्ये निर्माण करण्याचा अजित पवार नक्कीच प्रयत्न करतील. त्यातच एका दिवसापूर्वी शरद पवारांवर जाहीर टीका करणाऱ्या छगन भुजबळांनी दुसऱ्याच दिवशी शरद पवारांची भेट घेतली, चर्चा केली. या भेटीमागचे गूढ पुरते उकलले नसतानाच थेट सुनेत्रा पवार शरद पवारांच्या भेटीसाठी पोहचल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या, विशेष म्हणजे त्यावेळी सुप्रिया सुळेदेखील तिथे उपस्थित होत्या. या भेटीमागचे राजकारण किंवा गूढ तशी वेळ आल्यावरच स्पष्ट होईल; परंतु तूर्तास या भेटीगाठींनी राजकीय क्षेत्र बऱ्यापैकी ढवळल्या जात असल्याचे दिसते. हा भेटीगाठींचा सिलसिला निवडणुकीपर्यंत आणि कदाचित नंतर सरकार स्थापनेपर्यंत चालू शकतो आणि त्यातून काहीही फलित होऊ शकते.

## कटाक्ष

# 'अबकी बार २२५ पार!'



**जयंत माईणकर**
9821917163

१९८० पासून कुठल्याही आकड्याच्या घोषणेपासून दूर राहणाऱ्या शरद पवारांनी पहिल्यांदा 'अबकी बार २२५ पार' ही घोषणा केली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात एकाच पक्षाला अर्थात काँग्रेसला २००हून जास्त जागा मिळण्याचा प्रसंग फक्त दोन वेळा आला होता. १९६७ आणि १९७२ ला स्व. वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली अनुक्रमे २०३ आणि २२२ जागा आल्या होत्या. आज ५२ वर्षांनी त्या विक्रमाला गवसणी घालण्याची घोषणा शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार) आणि काँग्रेस या तीन पक्षांच्या महाआघाडीचे कर्तेकरविते शरद पवारांनी वयाच्या ८४ व्या वर्षी केली आहे. पुढील निवडणूक २०२९ ला होईल याचा विचार केला आणि पवारांच्या सध्याच्या वयाचा आणि प्रकृतीचा विचार केला, तर सध्याची निवडणूक कदाचित त्यांच्या आयुष्यातील शेवटची निवडणूक ठरू शकते.

लोकसभा निवडणुकीत भाजपच्या 'अबकी बार चार सौ पार' या घोषणेला खीळ घालण्याचे मुख्य काम ज्या दोन राज्यांत घडले त्यापैकी एक महाराष्ट्र! तेही पवारांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीमुळे! ३१ जागा जिंकून! लोकसभेच्या ३१ म्हणजे विधानसभेच्या १८६! ते गणित लक्षात ठेवूनच पवारांनी २२५ पारची घोषणा केली. पवारांच्या पक्षाने केवळ दहा जागा लढवून आठ जागा जिंकल्या होत्या.

विरोधकांनी दिलेल्या घोषणेचा पलटवार त्यांच्याचवर याहीपूर्वी पवारांनी केला आहे. १९९० साली शिवसेना- भाजप युतीच्या प्रचारात घोषणा होती एकच लक्ष्य विधानसभा! चित्र असायचे विधानसभेकडे अंगुलीनिर्देश करून दाखवणारे स्व. बाळासाहेब ठाकरे. निवडणूक प्रचारात आघाडी घेणारी युती ९४ वर थांबली आणि १४१ जागा जिंकून शरद पवार सत्तेवर आले. त्यावेळी एका सत्कार समारंभात एक होर्डींग लावले होते ज्यात पवार विधानसभेकडे अंगुलीनिर्देश करून म्हणत होते, एकच लक्ष विधानसभा! आज 'अबकी बार २२५पार' ही घोषणा देऊन ते भाजपच्या 'अबकी बार चार सौ पार' या घोषणेला उत्तर देत आहेत.

ज्या प्रकारची घोषणा पवारांनी केली आहे ती पाहता पवार विधानसभेच्या जागा वाटपात स्वतःच्या पक्षाला कमी जागा घेतील, असे वाटत नाही. उलट तीन पक्षांच्या आघाडीत तिन्ही पक्षांना प्रत्येकी ९६ जागा मिळाव्यात आणि मुख्यमंत्रिपद सर्वात जास्त जागा मिळविणाऱ्या पक्षाच्या नेत्याला मिळावे यासाठी ते आग्रही असू शकतात. तीन पक्षांच्या महाविकास आघाडीला जर २२५ पार जायचे असेल, तर या तीनही पक्षांना प्रत्येकी सत्तर ते पंचाहत्तर जागा जिंकाव्या लागतील आणि ते अशक्य वाटते. त्यातून जर तेवढ्या जागा जिंकून मविआ २२५ला पोचली, तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्र येऊन जर १४५ चा आकडा गाठू शकले, तर ते शिवसेनेला दूर ठेवून सरकार बनवू शकतील. अशावेळी महाराष्ट्रात नितीशकुमारांची भूमिका वठवत पुन्हा भाजपचा हात धरण्याचा विचार करू शकतात.

सहा पक्षांत विभागल्या गेलेल्या महाराष्ट्रातील बहुतेक सर्वच राजकीय पक्षांना आगामी निवडणुकीसाठी आपल्या नेत्याचा चेहरा मुख्यमंत्री म्हणून असावा याची ओढ लागली आहे. सहापैकी पाच पक्षांच्या अतिउत्साही कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी आपापले उमेदवार भलेही समोर केले असले तरीही शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे कार्यकर्ते या रेसपासून दूर आहेत किंवा पवारांनी त्यांना दूर ठेवले आहे. आणि आगामी निवडणुकीनंतर येणारे सरकार बनविण्यात शरद पवारांची भूमिका महत्त्वाची असेल! इतकेच नव्हे, तर नव्या सरकारचा मुख्यमंत्री आपल्या पसंतीचा असावा! किंबहुना त्या जागी आपली कन्या सुप्रियाच बसावी, असे पवारांच्या मनात असल्यास नवल वाटायला नको. आणि म्हणूनच की काय भावी मुख्यमंत्र्यांचा चेहरा देण्याच्या या रेसमध्ये राष्ट्रवादी उतरली नाही.

शरद पवारांची राजकीय खेळी सुरू होईल निवडणुकीनंतर! ही खेळी पवार याआधी १९८६ ला खेळले होते. पंचावन्न आमदार असलेला आपला पक्ष त्यांनी काँग्रेसमध्ये विलीन केला आणि त्यानंतर दीड वर्षात त्यांना मुख्यमंत्री करण्यात आले. लोकसभेतील राष्ट्रवादीचे आठ खासदार आणि आणि नव्याने निवडून आलेल्या आमदारांच्या भरवशावर पवार काँग्रेसची वाट धरू शकतात, कारण त्यामुळे लोकसभेत काँग्रेसची सदस्यसंख्या १०७ होईलच. १९८५ नंतर प्रथमच पूर्ण बहुमताचे काँग्रेस सरकार येऊ शकेल. त्यामुळे विलीनीकरणानंतर अर्थात काँग्रेसचा मुख्यमंत्री असेल. आणि त्यावेळी शरद पवार आपली कन्या सुप्रिया हिच्या नावाचा आग्रह धरू शकतात. विलीनीकरणाचा फायदा काँग्रेसला केंद्रात आणि राज्यात होणार असल्याने राहुल गांधीसुद्धा मान्यता देऊ शकतात.

मध्य प्रदेशात भाजपसाठी गेम चेंजर ठरलेली मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरलेली लाडकी बहीण योजना महाराष्ट्रात जाहीर झाली असली, तरीही त्याचा फायदा



महाराष्ट्रातील महायुती सरकारला मिळेल असे वाटत नाही, कारण जनतेच्या मनात या योजनेची महाराष्ट्रात घोषणा करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या भगिनी सुप्रिया यांचे सध्याचे ताणलेले संबंध आणि भगिनीच्या पराभवासाठी आपल्या पत्नीला निवडणुकीत उतरवणारे अजित पवार लक्षात आहेत.

तीच गोष्ट एकनाथ शिंदे यांची! कारण लोकांना वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावरून राजीनामा देऊन बांद्र्यातील आपल्या मातोश्री बंगल्यावर परतणारे उद्धव लक्षात आहेत. त्याचा प्रत्यय लोकसभेत आला आहेच आणि त्याच्याच भरवशावर पवार २२५ पार च्या घोषणा करत आहेत. अर्थात हा आकडा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढविण्यासाठी असतो, पण तरीही मविआ २२५ पार जरी नाही, तरी १७५ ते २०० च्या आसपास राहील, असे वाटते. त्याचबरोबर तुटपुंजे आमदार निवडून येणाऱ्या अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षांना भाजपमध्ये विलीन होणे हाच मार्ग असेल. आणि महाराष्ट्रात काँग्रेस, भाजप हे दोन प्रमुख पक्ष राहतील, तर तिसरा पक्ष उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना राहील, असे वाटते!

तूर्तास इतकेच!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## प्रासंगिक

# तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल

**डॉ. माया सुनील रंभाळे**
9970237221

वारकरी संप्रदाय हा हिंदू धर्मात असलेल्या भारतातील अनेक भक्ती संप्रदायांपैकी एक महत्त्वाचा संप्रदाय आहे. 'पंढरपूर' हे या संप्रदायाचे आद्यपीठ असून महाराष्ट्राचे धर्महृदय आहे. अठ्ठावीस युगांपासून पुंडलिकाने फेकलेल्या विटेवर उभा असलेला 'विठ्ठल', 'पांडुरंग' हे या संप्रदायाचे उपास्य दैवत आहे. हा संप्रदाय भक्तीवादी असून केवलाद्वैत मतवादाचा पुरस्कर्ता आहे. तसेच वेदप्रामाण्य मानणारा असून तो समन्वयवादी उपासना पंथ म्हणून ओळखला जातो. नाममहिमा, नामस्मरण हा वारकऱ्यांच्या भक्तीचा मूळ गाभा असून 'रामकृष्ण हरी' हा या पंथीयांचा मुख्य मंत्र आहे. ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत' आणि 'तुकारामांची गाथा' हे तीन ग्रंथ म्हणजे वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी आहे.

वारी ही एक परंपरा आहे, संस्कृती आहे. वारी करणारा तो वारकरी. वारीची प्रथा कोणी घालून दिली याबद्दल निश्चित पुरावा उपलब्ध नाही. तरी वारकरी संप्रदायात वारीची प्रथा फार जुनी आहे. ज्ञानेश्वरांचे पणजी- पणजोबा पंढरीची वारी करीत असल्याचा उल्लेख अनेक ग्रंथांत सापडतो. ज्ञानेश्वरीतील 'वारी' या शब्दाचा उल्लेख पुढीलप्रमाणेः

**'ऐसे वैराग्य हे करी। तरी संकल्पाची सरे वारी।।**
**सुखे धृतीचा धवळारी। बुद्धी नांदे।।**

(ज्ञानेश्वरी, अध्याय ६ ओवी ३७७)

प्रतिवर्षी किंवा प्रत्येक महिन्यात नियमितपणे पवित्र स्थानाच्या यात्रेस जाण्याची प्रथा असा 'वारी' या शब्दाचा रूढ अर्थ आहे. वारकऱ्यांच्या बाबतीत हे पवित्र स्थळ, म्हणजे श्री विठ्ठल किंवा पांडुरंग या दैवताचे निवासस्थान पंढरपूर होय. वारकऱ्यांसाठी विठ्ठल आणि पंढरपूर हे दोन्ही तीर्थासमान आहेत. आषाढी, कार्तिकी, चैत्री आणि माघी या पंढरपूरच्या मुख्य वाऱ्या होत. संपूर्ण महाराष्ट्रातून गावोगावच्या, देवस्थानच्या दिंड्या, पालख्या घेऊन पंधरा- वीस दिवसांचा, शेकडो मैलांचा प्रवास करून भक्त पंढरपुरात पांडुरंगाच्या दर्शनास दाखल होतात.

सोबत हत्ती, घोडे, तुळशी वृंदावन डोईवर घेऊन निघालेल्या स्त्रिया, टाळ- मृदंगाच्या गजरात ताल धरून नाचणारी भक्त मंडळी बघताना वाह! क्या बात है... असे आश्चर्यकारक उद्गार तोंडून बाहेर पडतात. अवर्णनीय, शब्दातीत असा हा वारीचा सोहळा पाहून डोळ्यांचे पारणे न फिटले तरच नवल! परत परत मन विठ्ठलाकडे ओढ घेऊ लागते.

वारकरी पंथालाच 'भागवत धर्म' अथवा 'माळकरी पंथ', असेही म्हणतात. विठ्ठलाला तुळशीची माळ प्रिय असल्याने ती घालणारा वारकरी म्हणून तो माळकरी होय. प्रपंचात राहून हरिभक्तीचा मार्ग जनसामान्यांना वारकरी संप्रदायाने दिला. वारीचे मुख्य दैवत 'श्रीविठ्ठल' हे श्रीकृष्णाचे रूप आहे. 'जय जय राम कृष्ण हरी' हा वारीचा महामंत्र असून वारी करताना 'ज्ञानोबा माउली तुकाराम' किंवा 'निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम।', असा गजरही वारकरी करतात. भक्तीच्या या महासागरात तरुन जाण्यासाठी जमलेला वारकऱ्यांचा पोहा (मेळावा) पाहता मन आनंदाने गदगद होऊन जाते. चंद्रभागेच्या वाळवंटात जमलेली ही विठ्ठल भक्तांची मांदियाळी विठ्ठल दर्शनास आसुसलेली दिसते. वारकरी मेळाव्याचे वर्णन ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगातून केले आहे. ते म्हणतात,

**'कुंचे पताका झळकती। टाळ मृदंग वाजती।**
**आनंदे प्रेम गर्जती। भद्रजाती विठ्ठलाचे।।**

**(ज्ञानेश्वर)**

वारकरी संप्रदायाचा उगम महामुनी पुंडलिक या महान भक्तापासून मानला जातो. विठ्ठलाची भक्ती व उपासना इथूनच सुरू झाली; परंतु या भक्तीला वैचारिक जोड ज्ञानेश्वरादी संत मंडळींनी दिली. पुंडलिकाचे वर्णन करतानाचा जनाबाईंचा पुढील अभंग प्रसिद्ध आहे.

**भक्तामाजी अग्रगणी। पुंडलिक महामुनी।।**
**त्याचे प्रसाद तरले। साधुसंत उद्धरिले।।**

(श्रीसकल संतगाथा १६७)

तुकाराम महाराज पुंडलिकाचे गुणगान करताना म्हणतात, 'उदार चक्रवर्ती। वैकुंठीचा भूपती। पुंडलिकाचिया प्रीती। विटे उभा राहिला।।'

(श्रीसकल संतगाथा संत तुकाराम २९१०)

नामदेव महाराजांनी पांडुरंगाच्या आरतीत विठ्ठलाच्या आद्यत्वाचा उल्लेख केला आहे.

'युगे अठ्ठावीस। विटेवरी उभा। वामांगी रुखमाई। दिसे दिव्य शोभा। पुंडलिकाचे भेटी। परब्रह्म आले गा। चरणी वाहे भीमा। उद्धरी जगा'।'

यावरून वारकरी संप्रदायाच्या बाबतीत पुंडलिकाचे आद्यत्व पटते. तरी 'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस', असे म्हटले जाते. याचा अर्थ ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला असे नव्हे, तर ज्ञानदेवांनी या वारकरी संप्रदायाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले व त्याला व्यवस्थित रूप दिले असा होतो. या संदर्भात संत बहिणाबाईंचा अभंग उल्लेखनीय आहे. 'संतकृपा झाली। इमारत फळा आली।

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारले देवालया।
नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार।
जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।
बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपण केले वोजा।।

(श्री सकल संत गाथा संत बहिणाबाई ३२)

या अभंगावरून वारकरी संप्रदायरूपी इमारत उभारण्यात ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांचे कार्य किती मोलाचे आहे याचा परिचय होतो. वारकरी संप्रदायाची इमारत उभारण्यात या मुख्य संतांशिवाय अठरापगड जातीतून आलेले चोखामेळा, कर्ममेळा, सावतामाळी, नरहरी सोनार, अशा अनेक संत महंतांसोबतच स्त्री संतांचाही मोलाचा वाटा आहे. त्यामध्ये संत मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई, भागू यांसारख्या स्त्री संतांचा समावेश आहे. या संतांच्या मांदियाळीला ज्ञानेश्वरांनी मनाशी बाळगलेले विश्वकल्याणाचे स्वप्न खरे करून दाखवायचे होते. त्यासाठी त्यांनी आपल्या वाणीतून ज्ञानाचा अखंड झरा पाझरविला. संतांना नामदेवांनी म्हटल्याप्रमाणे, 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' सर्व जगभर ज्ञानाचा दीप उजळवायचा होता. त्यासाठी इतकी वर्षे ही संतवाणी झटली. या संतांनी प्रवचन, कीर्तन, भारूड, अभंग, ओव्या, जात्यावरची गाणी, अंगाईगीत, गौळण, भूपाळी, गोंधळ, दशावतार, वासुदेवाची गाणी, भराडी गीत, कूटरचना इ. प्रकारांतून वारकरी संप्रदायाचेच नव्हे, तर महाराष्ट्रीय लोकसंस्कृतीचेच दर्शन घडविले.

शेकडो वर्षे लोटूनही पंढरपुरात आजही भक्तीचा महासागर उसळताना दिसतो तो पांडुरंगावरील भक्तांच्या अपार प्रेमामुळेच. अहिंसेचे प्रतीक असणारा विठ्ठल सर्वांना आपला वाटतो. आजही आई जसे बाळाचे संरक्षण करते, त्याचे गुन्हे माफ करून त्याला जवळ पोटाशी धरते तद्वत ही विठाई माउली भक्तांना आपली आई वाटते. त्यामुळे तिच्या दर्शनासाठी वर्षातून एकदा का होईना इतके कष्ट सोसत भक्त तिथपर्यंत पोहोचतो. जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा यांच्याप्रमाणेच तो आपल्या अडीअडचणीतही सोबत आहे ही भावना मन सुखावून टाकते. म्हणून आजही लाखोच्या संख्येने भक्त माउलीला डोळे भरून पाहण्यासाठी इतक्या दूर जातात. यामुळे लेकरं आणि माउली दोन्हीही सुखावतात.

## डिजिटेक

# मोबाइल, लॅपटॉप, स्मार्टवॉच जोडणारा ब्लूटूथ



**देवनाथ गंडाटे**
7264982465

डिजिटल मीडिया अभ्यासक, नागपूर

ब्लूटूथ तंत्रज्ञानामुळे हल्ली लॅपटॉपपासून ते स्मार्टवॉचपर्यंत सर्व डिव्हाइस एकत्र लिंक करणे अतिशय सोपे झाले आहे. मात्र, ब्लूटूथमुळे होणारे संभाव्य धोके प्रत्येकाने समजून घेणे महत्त्वाचे आहे. तुमचा व्यक्तिगत डेटा व गोपनीय माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी हे धोके समजून घेतल्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार नाही.

मोबाइल फोन, लॅपटॉप, संगणक, प्रिंटर, डिजिटल कॅमेरा, डिजिटल स्पीकर, माईक, हेडफोन, नवीन बाईक, कार, व्हीडियो गेम, सिलिंग फॅन, कुलर, लाईट आदी साधनांत दोन उपकरणांना जोडण्यासाठी रेडियो तरंगचा वापर होतो. ज्याला ब्लूटूथ अशी ओळख आहे. आज प्रत्येकजण माहिती आणि फाईल देवाण-घेवाणीसाठी ब्लूटूथचा वापर करीत आहे.

ब्लूटूथ हे नाव मध्ययुगीन स्कॅन्डिनेव्हियन राजा हॅराल्ड ब्लूटूथ गोर्मसन यांच्या नावावरून देण्यात आले. ते सन ९५८ ते ९८६ पर्यंत डेन्मार्कचे राजा होते. अनेकांना प्रश्न पडतो की, ब्लूटूथच्या मालकाने या तंत्रज्ञानाचे नाव त्या राजाच्या नावावर का ठेवले? राजा हॅराल्ड ब्लूटूथ गोर्मसन यांनी नॉर्वे आणि इंग्लंडचा काही भाग अर्थात डेन्मार्क जिंकून स्कॅन्डिनेव्हियन देशांना एकत्रित केले. दुसरे म्हणजे, राजाच्या एका दाताचा रंग गडद निळा/राखाडी होता. त्यामुळे त्याला ब्लूटूथ या टोपणनावाने ओळखले जाऊ लागले. राजा हेराल्ड ब्लूटूथने दोन राज्यांना जोडले. यामुळे ब्लूटूथ तयार करणाऱ्या टिमचे सदस्य जिम कार्डेक यांनी त्या तंत्रज्ञानासाठी ब्लूटूथचे नाव सुचवले. जे सर्वांना आवडले, त्यानंतर त्या तंत्रज्ञानाचे नाव ब्लूटूथ ठेवण्यात आले. डिजिटल युगात इलेक्ट्रॉनिक उपकरणांना देवाण-घेवाणीसाठी जोडण्याचे काम ब्लूटूथ करीत आहे. ब्लूटूथ हे एक लहान-श्रेणीचे वायरलेस तंत्रज्ञान मानक आहे. ज्याचा वापर मोबाईल उपकरणांमधील डेटाची देवाण-घेवाण कमी अंतरावरील आणि वैयक्तिक क्षेत्र नेटवर्क तयार करण्यासाठी केला जातो.

ब्लूटूथचा जन्म १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला झाला होता, केबल आणि वायरशिवाय मोबाइल उपकरणांना कनेक्ट करू शकेल, अशा तंत्रज्ञानाचा विकास करण्याचा प्रयत्न इंजिनीअर आणि शास्त्रज्ञांनी केला. आज, ब्लूटूथ हे स्मार्टफोन, टॅबलेट, लॅपटॉप, स्पीकर, हेडफोन आणि स्मार्टवॉचसह विविध प्रकारच्या उपकरणांमध्ये वापरले जाते. हे वायरलेस कनेक्टिव्हिटीसाठी एक लोकप्रिय साधन बनले आहे, कारण ते वापरण्यास सोपे आहे.

आजकाल ब्लूटूथ हे सर्व फोनमध्ये असते आणि बरेच जण रोज त्याचा वापरसुद्धा करतात. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ हे ऑप्शन देण्यात आले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाईल ट्रान्सफर करण्यासाठी, व्हिडिओ, गाणी ऐकण्यासाठी ब्लूटूथचा वापर होतो. म्हणून आता अनेकांकडे वायर्ड इअरफोन्सच्या जागी ब्लूटूथ पाहायला मिळतात. ब्लूटूथ तंत्रज्ञानामुळे हल्ली लॅपटॉपपासून ते स्मार्टवॉचपर्यंत सर्व डिव्हाइस एकत्र लिंक करणे अतिशय सोपे झाले आहे. मात्र, ब्लूटूथमुळे होणारे संभाव्य धोके प्रत्येकाने समजून घेणे महत्त्वाचे आहे. तुमचा व्यक्तिगत डेटा व गोपनीय माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी हे धोके समजून घेतल्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार नाही. ब्लूटूथ पूर्णपणे सुरक्षित नसले तरीही, सावध राहण्यासाठी ब्लूटूथ हेडसेटचा वापर मर्यादित केला पाहिजे. वापरात नसताना हेडसेट, फोन, इतर गॅझेट शरीरापासून दूर ठेवा. बिछान्यावर गॅझेट घेऊन झोपू नका.

फोन कॉल करण्यासाठी किंवा व्हिडिओ पाहण्यासाठी, अधिक काळ ऑडिओ ऐकण्यासाठी हेडसेटचा वापर कमी करण्याचा प्रयत्न करावा. वापरात नसताना वायरलेस उपकरणे कान किंवा डोक्यातून काढले पाहिजे. सातत्याने ब्लू-टूथ इयरफोन्स वापरल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे काळजी घेऊन वापर करावा.

## वाचक विचार मंच

# गड- किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवा!

विशाळगडावरील अतिक्रमणाचा मुद्दा हळूहळू गंभीर स्वरूप धारण करू लागला आहे. इतिहासकालीन गड-किल्ले हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ठेवा आहे. त्याचे ज्या तळमळीने जतन करणे अपेक्षित होते तसे गेल्या काही वर्षांत न झाल्याने आज जवळपास सर्वच गड-किल्ल्यांवर कमी- अधिक प्रमाणात अतिक्रमण झालेले पाहायला मिळत आहे.

राज्य प्रशासनाच्या आणि पुरातत्त्व खात्याच्या नाकर्तेपणामुळे अनेक गड- किल्ल्यांवर अनधिकृत वस्त्या, मजार, दर्गे, बाजारपेठा, मांस- मटणाची दुकाने उभी राहिलेली पाहायला मिळत आहेत. परकीय आक्रमकांच्या जोखडातून या गड- किल्ल्यांना मुक्त करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी जिकरीने लढा दिला, मावळ्यांनी आपले रक्त सांडले, प्रसंगी प्राणांचे बलिदान दिले. मावळ्यांच्या बलिदानाची आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे हे गड-किल्ले महाराष्ट्राच्या भावी पिढीचे प्रेरणास्रोत आहेत. अशा पावन भूमीवर झालेली अतिक्रमणे, तेथील मांस-मटणाची दुकाने या गड किल्ल्यांचे पावित्र्य भंग करत आहेत. इतिहासाच्या पाऊलखुणा नष्ट करू पाहणाऱ्या या अतिक्रमणांचा बंदोबस्त करावा यासाठी आजमितीला अनेक इतिहासप्रेमी संघटना, इतिहासकार, शिवभक्त, हिंदुत्वनिष्ठ संघटना सनदशीर मार्गाने सरकार दरबारी निवेदने देत आहेत, शांततेने आंदोलने करत आहेत.

शिवभक्तांच्या पाठपुराव्याची दखल घेत राज्यसरकारने प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या अफजलखानाच्या थडग्याजवळील अनधिकृत बांधकाम तोडून धाडसी पाऊल उचलले होते, अशाच प्रकारे समस्त गड- किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवून गड- किल्ल्यांचे हरवत चाललेले सौंदर्य, भंग होत चाललेले पावित्र्य राज्य सरकारने रोखावे अशी राज्यातील शिवभक्तांची आणि इतिहासप्रेमींची अपेक्षा आहे!

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
मुंबई

**बोल बाबा बोल!** धमाल

घोषणा अन् आश्वासने
हा निवडणुकीचा पार्ट आहे
ह्या मायावीजालात अडकवणं
ही खरीखुरी आर्ट आहे

खोटं बोल पण रेटून बोल
फाटेपर्यंत ताण नरडा
क्षणोक्षणी असे रंग बदल
की तुला बघून लाजेल सरडा


तोच मुरब्बी राजकारणी
जो खुबीने वापर करतो थापांचा
मुंगीच्या पायातूनही जो
आवाज काढतो घोड्यांच्या टापांचा

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

# धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपणारी पंढरपूरची आषाढी वारी...

आषाढी वारी म्हटले, की डोळ्यासमोर उभे राहते ते अवघ्या महाराष्ट्राचे दैवत श्रीक्षेत्र पंढरपूर येथील विठोबा- रखुमाई. या आषाढी वारीमध्ये जात-पात, धर्म भेद, उच्च, नीच, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेदभाव न करता भक्तीभावामध्ये लीन होऊन टाळ मृदंगाच्या गजरात विठुरायाचा जप केला जातो. आजच्या डिजिटल युगातही वारकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होते आहे. स्नेह आणि ज्ञानाची जीवनमूल्ये अधिक वाढावीत, सर्वांमधला चैतन्याचा अंश एकच आहे ही मनोधारणा वाढावी हाच वारीचा संदेश आहे. आज विज्ञानाने जग जवळ आणले; पण माणसं माणसाजवळ आली नाहीत हे वास्तव आहे; पण वारी त्यासाठी सक्षम आहे. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर यांच्या पादुका तर देहू येथून संत तुकाराम यांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी एक सामुदायिक पदयात्रा होते. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. वारकरी संप्रदायात लहान- मोठा हा भेद नाही, तसेच नामजपाने पुण्य मिळते हा भाव आहे. 'पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान, आणिक दर्शन विठोबाचे' या इच्छेपोटी



वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिला-पुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे!

**राजू जाधव,**
मांगूर, जि. बेळगांव

## गुल्लेर

# द्या पाठून



**नरेंद्र इंगळे**
9561226572

'हॅलो..आहेत काय जवाई घरी?'

'बोला मामाजी..'

'आमच्या पोरीवर ध्यान ठेवत जा.. तब्यत लय लोळ झाली तिची..'

'तुमाले कसं ठाऊक?'

'काल पोरीचा व्हिडीओ कॉल आलता..लयच सोकल्यासारखी दिसली.'

'खायाले असल्यावर खात नाही तुमची पोरगी.'

'तुम्ही काय खाऊ घालता तिले?'

'आपला कॅटरींगचा धंदा नाही काय?'

'लग्नातली बुंदी, जिलबी उरली की घरी आनतो तिच्यासाठी.'

'तेलगट खाऊ घालू नका तिले.. नाहीतर दवाखान्यात घेऊन जा.'

'नेलं होतं दवाखान्यात.. डाक्टर म्हने तिले नॉनव्हेज खाऊ घाला. आंडे खात नाही तुमची पोरगी.'

'चांगलं- चुंगलं खाऊ घालत जा..दूध- तूप देत जा.'

'तूपच भेटत नाही आमच्या गावात.'

'किराना दुकानात तुपाचा डबा भेटते.'

'डब्याच्या तुपाले चव नसते..तिले..सरकीचं तूप पाह्यजे म्हनते..देना एखांदी म्हैस पाठून..तुमच्यापाशी दोन म्हशी आहेत.'

'त्यातली एकच दूध देते..तेवढं आमालेच पाह्यजे.'

'पोरीले म्हैस देली तं काय होते? तुमच्याच पोरीची तब्यत सुधरते.'

'ते माह्याशिवाय कोनाले दूध देत नाही.'

'तुम्ही पाठून तं द्या..मी सरकी करतो तिले.'

'म्हशीचा कुटाना होते काय तुमच्याकून? म्हैस वागोनं सोपी नाही. तिच्याच भोवती राहा लागते.'

'तुमच्या पोरीसाठी म्हनतो.. तिचंच वजन कमी झालं.'

'म्हैस तं नाही..वगार हाय.'

'केवढी हाय?'

'सहा मयन्याची.'

'बापारे..तिले पाच वर्ष कोन वागोईन? दुभती पाठवा.'

'दुभती एकच हाय ना..त्याच्यापेक्षा असं करा.. पोरीलेच मयनाभर पाठून द्या इकडे.'

'ते गेल्यावर माहे खायापियाचे येले होतीन.'

'एक मयना हातानं सैपाक करा.'

'एकट्याले हुरहुर लागते घरात.. त्याच्यापेक्षा मी येतो मयनाभर राहाले.''तुम्ही कायले येता धंदा टाकून?'

'नाहीतरी मयनाभर लगनाचा सिजन नाही. आराम हाय मले.. पहा बुवा..तुमच्या पोरीसाठी म्हनतो मी.. इचार करुन सांगा मले ..पोरीसाठी तेवढं करत ना काय?'

# केजमध्ये कृषी कार्यालय कधी होणार?

- कृषी कार्यालय विभागाची १० हेक्टर जमीन पडून!
- कृषी कार्यालय ३५ वर्षांपासून किरायच्या जागेत
- कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रश्न सोडविणे गरजेचे
- हक्काची जागा नसल्याने मोठी गैरसोया

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरातील बसस्थानकासमोरील फळ रोपवाटिकेची दहा हेक्टर जमीन कृषी विभागाच्या मालकीची असून ही जमीन सध्या पडीक आहे. मात्र येथील तालुका कृषी कार्यालयामागील ३५ वर्षांपासून किरायाच्या इमारतीत असून इमारत भाड्यावर वर्षाला दीड लाख रुपयांचा खर्च होत आहे. धनंजय मुंडे यांच्या रूपाने राज्याचे कृषिमंत्रिपद बीड जिल्ह्याला मिळाले असताना त्यांनी इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे. निजाम काळापासून केज शहरातील बसस्थानकासमोर आणि मोक्याच्या ठिकाणी १० हेक्टरहून अधिक जमीन कृषी विभागाच्या मालकीची आहे. त्या काळी ही जमीन




फळ रोपवाटिकेसाठी संपादित करण्यात आली होती. अनेक वर्षे रोपवाटिका कृषी सुरू राहिली. त्यामुळे हा परिसर निसर्गरम्य बनला होता. ही रोपवाटिका बंद पडल्याने वापर नसल्याने ही जमीन पडीक राहिली. त्यामुळे या जमिनीवर गावठी दारू निर्मिती केली जाऊ लागली.

शिवाय या जागेचा वापर अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची पार्किंग व घाण, कचरा टाकण्यासाठी केला जातो. दुसरीकडे गेल्या ३५ वर्षांपासून तालुका कृषी कार्यालयाला स्वतःची हक्काची इमारत मिळालेली नाही. पूर्वी ग्रामपंचायतीच्या जागेत आणि खासगी इमारत भाड्याने घेऊन कार्यालयाचे कामकाज केले जाते. कृषी कार्यालयाच्या ताब्यात १० हेक्टरहून अधिक जमीन शहराच्या मध्यवर्ती आणि मोक्याच्या ठिकाणी असताना कृषी कार्यालय भाड्याच्या इमारतीमध्ये फिरत आहे. भाड्याने घेतलेल्या इमारतीतही अपुऱ्या खोल्या असून सोयी–सुविधांचा अभाव आहे.

## आषाढीनिमित्त शिवसेनेकडून भाविकांसाठी महाप्रसाद

अध्यात्मिक : जगताप, मुळूक यांच्याकडून भाविकांना शुभेच्छा



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आषाढी एकादशी हा उपवासाचा दिवस लक्षात घेऊन भाविकांसाठी बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी एकादशीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड तथा सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड येथे महाप्रसादाचे आयोजन केले होते. यादरम्यान बीडमधील भक्त भाविकांना तीन क्विंटल साबुदाणा खिचडी आणि फळांचे वाटप करण्यात आले. काल सकाळी १०. वाजल्यापासून महाप्रसादाच

पान २ वर...

## जलजीवन मीशनचे काम अर्धवट!

सवाल : केज आमदार कुठे आहात

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोरडेवाडी येथील जलजिवनचे काम निकृष्ट दर्जाचे व अर्धवट राहीलेले आहे .तरी केज तालुक्यातील भुरट्या आमदारा नमीता मुंदडा लोकप्रतिनिधी म्हणून गावाला पाणी पाजनार का अशी मागणी गावकऱ्यांन कडुन करण्यात येत आहे.जलजिवन योजनेसाठी दलित वस्ती मधील चांगला सुबक रस्ता खोदुन नुकसान केले आहे, त्याची दुरुस्ती करुन मिळावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे तसेच जलजिवन मिशन योजनेचे अर्धवट काम करणा–या ठेकेदारावर कडक कार्यवाही करावी व त्याचे बिल आपल्याकडे असल्यास अदा न करणे अशी सुध्दा मागणी गावकऱ्यांनी



निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे.या विषयी सविस्तर वृत्त असे की मौजे कोरडेवाडी, ता. केज, जि. बीड अंतर्गत दलित वस्ती मध्ये अतिशच चांगला सिमेंट काँक्रीटचा रस्ता होता व नाली होती. परंतु नागरीकांनी विरोध केल्यानंतर सुध्दा हा रस्ता फोडून तोडुन जलजिवन मिशनच्या ठेकेदाराने टाकला आहे, तसेच रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडुन पाणी साठत आहे, त्यामुळे नागरीकांना डेंग्यु, मलेरिया इ. आजारांना सामोरे जाण्याची शक्यता आहे. तसेच या रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करुन दयावी, व संबंधीत ठेकेदारावर योग्य ती कडक कायदेशिर कार्यवाही करून कोरडेवाडी येथील दलितांना न्याय मिळवून देण्यात यावा. तसेच संबंधीत ठेकेदारावर जर आपण कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही तर आम्ही सर्व नागरिक लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालयावर आंदोलन, उपोषण करु याची जबाबदारी प्रशासना कडे राहील असे निवेदनाद्वारे कोरडेवाडी येथील नागरिकांना कडुन करण्यात आली आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) जिल्हा कार्यालय बीड मार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असुन या योजनेसाठी मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षात १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकिय व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमांमध्ये विशेष प्राविण्याने गुणवत्ता मिळवुन ६० टक्के गुण किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर शिष्यवृत्तीचे वितरण करण्यासाठी जास्त टक्केवारी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची गुणानुक्रमानुसार निवड मुख्यालय मुंबई यांच्याकडुन उपलब्ध निधीच्या प्रमाणात केली जाते याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

सदर योजनेचा अर्ज भरत असताना अर्जासोबत अर्जदाराचा जातीचा दाखला (सक्षम अधिकारी यांच्याकडुन घेतलेला (असावा), अर्जदाराच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांच्याकडुन घेतलेला असावा), रेशन कार्ड, आधार कार्ड, झेरॉक्स प्रत, गुणपत्रक, दोन पासपोर्ट साईज फोटो, बोनाफाईड / पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्जदाराने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ

पान २ वर...

## जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण!

कारवाई : आठ जणाविरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी

दारू पिऊन जातीवाचक शिवीगाळ करून कुटुंबातील लोकांना काठी आणि दगडाने मारहाण केल्या प्रकरणी आठ जणांच्या विरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दि.१५ जुलै रोजी केज तालुक्यातील कळंबअंबा येथील गणेश शिवाजी मस्के व त्यांचे चुलते उत्तम मस्के हे त्यांच्या घरा समोर बसलेले असताना त्यांच्या शेतात शेजारी शेत असलेला बंकटी हरीभाऊ तारुकर हा दारु पिऊन त्यांच्याकडे आला. त्याने विनाकारण दोघांना जातीवाचक शिविगाळ करु लागला.

भांडणाचा आवाज ऐकुन गणेश मस्के याचे वडिल शिवाजी मस्के, आई मैनाबाई मस्के व पत्नी रंजना मस्के, चुलती कांचना मस्के, चुलती लक्ष्मी मस्के असे घराचे बाहेर आले. त्यानी बंकटी तारुकर यास आमचे लोकांना शिविगाळ का करता. असे म्हणताच बंकटी तारुकर याने गणेश मस्के यांचे चुलते उत्तम रंगनाथ मस्के यांना डोक्यात दगड मारुन दुखापत केली. नंतर बंकटी तारुकर यांने फोन करुन त्याचे वडिल हरीभाऊ काकासाहेब तारूकर



व नातेवाईकांना फोन करुन बोलावुन घेतले. त्या पैकी हरीभाऊ काकासाहेब तारुकर याने गणेश मस्के यांचे वडिल शिवाजी रंगनाथ मस्के यांच्या पाठीमध्ये काठीने मारहाण करुन मुक्कामार दिला. तर त्यांच्या सोबतच्या नातेवाईकांनी काठी आणि दगडाने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. गणेश मस्के यांच्या तक्रारी वरून बंकटी हरिभाऊ तारुकर, हरीभाऊ काकासाहेब तारुकर, गणेश रामभाऊ तारुकर, रंधावणी रामभाऊ तारुकर, शालुबाई, सिताबाई हरिभाऊ तारुकर,

पान २ वर...

## अत्याचार प्रकरणी तिघांना जामीन

ॲड. तेजेस नेहरकरः कोर्टात भक्कम पुरावे दाखल

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

घटनेची हकीकत अशी की, पिडीतेच्या जवाबावरुन आरोपींनी बळजबरी लग्न लावुन अत्याचार केला, सदर प्रकरणी आरोपी लखन बर्डे, राम बर्डे, कृष्णा रुपनर, रा. बीड, लातुर यांचे विरुध्द गेवराई पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २३५/२०२४ कलम ३६३, ३६६,३७६,३७६(प)(२) सह कलम पोक्सो कलम ९, १०, ११ बालविवाह कायदा २००६ नूसार गुन्हा नोंद झाला होता. सदर प्रकरणात मुख्य आरोपी लखन बर्डे यास पोलीसांनी अटक केली होती. व दोघे फरार होते.

ड. तेजेस नेहरकर यांच्या मार्फत मा. न्यायालयात तिन्ही आरोपींचा जामीन अर्ज दाखल करण्यात आला होता. ड तेजेस नेहरकर यांनी



आरोपीच्या वतीने मांडलेली भक्कम बाजु, व पुरावा विचारात घेऊन आरोपींना मा. न्यायालयाने लखन यास रेगुलर, राम व कृष्ण यास अटकपूर्व जामीन मंजुर केला आहे. आरोपीचे वतीने ड. तेजेस सुभाष नेहरकर यांनी काम पाहिले.

## पदोन्नतीचा प्रस्ताव परिषदेकडे पाठविला

दिलासा : डॉ मिलिंद अहिरे यांचे उपोषण यशस्वी

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ मिलिंद अहिरे यांनी विविध मागण्यासाठी सपत्निक सुरू केलेले उपोषण यशस्वीपणे मागे घेतले उपोषणकर्ती चा मागणी नुसार सर्व प्राध्यापकांचे पदोन्नतीचे प्रस्ताव कुषी परिषदेकडे पाठविण्याचे प्रशासनाने मान्य केले आहे

कुषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रशांत कुमार पाटील कुलसचिव अरुण आनंदकर यांनी पुढाकार घेऊन सामंजस्याची भुमिका घेऊन उपोषणकर्ते प्राध्यापक डॉ मिलिंद अहिरे व त्यांच्या पत्नी वैशाली अहिरे यांची भेट घेतली मागण्या संदर्भात लवकरात लवकर सकारात्मक तोडगा काढण्यात येईल असे प्रशासनाचा वतीने त्यांना आश्वासित करण्यात आले आश्वासन मिळाल्यानंतर डॉ अहिरे यांनी उपोषण सोडण्याचे मान्य केले कुलगुरू डॉ पाटील व कुलसचिव आनंदकर यांनी नारळ पाणी देऊन उपोषण सोडविले. विद्यापीठाच्या

पान २ वर...



### उपोषण वैयक्तिक प्रश्नांसाठी नव्हते

डॉ मिलिंद अहिरे यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी उपोषण केले असे आरोप करुन त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात होता परंतु प्रशासनाने डॉ अहिरे यांच्या सोबत इतर सर्व प्राध्यापकांचे पदोन्नतीचे प्रस्ताव पाठविण्याचे ठरविले त्यामुळे असा आरोप करणा–याचे दात घशात गेल्याची चर्चा मोठ्या खुबीने होत आहे

## परळीमध्ये प्रभागनिहाय नोंदणी कॅम्पास सुरूवात

बाजीराव धर्माधिकारी : योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार साहेब,कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे व माजी मंत्री आ. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दिनांक १५ जुलै ते २६ जुलै दरम्यान परळीचे माजी नगराध्यक्ष व गटनेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परळीच्या वतीने परळी शहरात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे प्रभागनिहाय नोंदणी कॅम्प सुरु झाले असून या शिबिरातून जास्तीत जास्त बहीणीनी नोंदणी करावी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व सहकाऱ्यांनी प्रत्येक बहिणीला दरमहा १५००/– रुपये सन्मान निधी सुरु करुन द्यावा ही नम्र विनंती.

माणिक नगर भागात शिबिराला भेट देवून एका बहिणीचा प्रातिनिधीक अर्ज भरून दिला

पान २ वर...

बोंबला | पाच वर्षांपासुन रिक्त पदांचा दुष्काळ

## शिक्षकांच्या खांद्यावर जबाबदारीचे ओझे!

आल्ताफ कुरेशी/तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा गावात प्रामुख्याने इयत्ता पहिली जिल्हा परिषद ते ८ वी पर्यतची उर्दु शाळा आहे परंतु त्या शाळेत सध्या विद्यार्थ्यांना शिकवण्याकरिता एक मुख्याध्यापक, दोन पदावर दोन शिक्षक कार्यरत आहेत या तीन शिक्षकांच्या खांद्यावर शाळेची जबाबदारी ओझे शिक्षण विभागाने लादले आहे.

गांवातील सदरील पालकांनी बीड जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे वार – वार मागणी करुन सुध्दा रिक्त पदे भरलेच नाही तलवाडा जिल्हा परिषद उर्दु शाळेची शिक्षकांची रिक्त पदे नाही भरल्याने आज विध्यार्थीवर शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे माहा पाप शिक्षण विभाग करत आहे.असे पालक व ग्रामस्थांकडून




संताप जनक बोल बोलले जात आहे, पहिली ते आठवीपर्यंत अभ्यासक्रमाला लागणारे पूर्ण शिक्षक नसल्यामुळे तीनच शिक्षकांवर आठवीपर्यंतची जबाबदारी येऊन ठेपली असल्यामुळे शालेय अभ्यासक्रमात शिक्षकांची कमतरता भासत आहे. एकीकडे शासन सांगते की एक रोटी कम खाओ लेकीन बच्चो को पढाव परंतु उर्दू माध्यमला शिक्षकांची भरती नसल्यामुळे शिक्षणात हेळसांड होतांना दिसत आहे. पोर्टल व्दारे नियुक्त शिक्षकांपैकी तलवाडा जिल्हा परिषद उर्दु शाळेत नियुक्त शिक्षकांपैकी एक शिक्षक तात्काळ देण्यात यावे अन्यथा शाळा व्यवास्थापन समितिचे अध्यक्ष मोलाना जाकेर, मुफ्ती तालेब, शेख आल्ताफ, शिक्षण विभाग बीड,गट शिक्षणाधिकारी गेवराई यांना निवेदन देण्यात आले आहे. रिक्त पदे नाही भरल्यास पालक वर्गाने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## पालकांना अडचणीत आणू नये

राजेश पाटीलः केज पोलीस ठाण्यात शिबीर

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

१८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींना वाहन चालविण्याचा परवाना मिळतो. त्यामुळे अल्पवयीन मुलांनी दुचाकीसह इतर वाहने चालवून अपघात घडल्यास त्यांच्या पालकावर गुन्हा दाखल होतो, तर शिक्षाही होते. म्हणून अशा विद्यार्थ्यांनी स्वतः वाहने चालवून पालकांना अडचणीत आणू नये, असे आवाहन केज ठाण्याचे फौजदार राजेश पाटील यांनी केले.केज ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस ठाण्यात विद्यार्थ्यांना विविध अत्याधुनिक शस्त्रे, सायबर गुन्हे,वाहतूक नियमांची माहिती मिळावी म्हणून



शहरातील शारदा इंग्लिश स्कूल येथे माहिती व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरास फौजदार राजेश पाटील, प्राचार्य एस. एम. मिश्रा, शाळेचे व्यवस्थापक प्रवीण देशमुख, उपप्राचार्य सूरज सनी, जमादार सानप, मोरे, वाहतूक शाखेचे गोरख फड यांची प्रमुख उपस्थिती होती. फौजदार पाटील म्हणाले की, प्रत्येकाच्या घरी स्मार्ट मोबाइल असून तो मोबाइल सायबर गुन्ह्याचा मार्ग आहे.

पान २ वर...